
रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक ३०९
www.ramprahar.com
◆ गुरुवार, २८ मे २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

‘किनारी सुरक्षेसाठी समन्वय यंत्रणा अधिक सक्षम करणार’/२
उरणमध्ये ४० मुलांनी घेतले छायाचित्रणाचे धडे/६
आयपीएलचा आता वर्षातून दोनदा रंगणार थरार/८

## हिंदी महासागरात जहाजावरील हल्ला उधळला



**नवी दिल्ली :** पश्चिम हिंदी महासागरात समुद्री चाच्यांचा संभाव्य हल्ला भारतीय नौदलाने हाणून पाडला आहे. महासागरात ‘एमव्ही माशाल्लाह १’ या व्यापारी जहाजाजवळ समुद्री चाच्यांच्या संशयास्पद हालचाली दिसल्यानंतर भारतीय नौदलाने तत्काळ प्रतिसाद देत संभाव्य हल्ला हाणून पाडला. संशयास्पद हालचाली दिसून येताच नौदलाने व्यापारी जहाजाच्या मदतीसाठी ‘आयएनएस कोलकाता’ तैनात केले. नौदलाच्या वतीने याबाबत माहिती देण्यात आली. भारतीय नौदलाने प्रसिद्ध केलेल्या माहितीनुसार पश्चिम हिंदी महासागरात ‘एमव्ही माशाल्लाह १’ या व्यापारी जहाजाजवळ समुद्री चाच्यांच्या संशयास्पद हालचाली दिसल्या. संशयास्पद हालचाली व संभाव्य धोका लक्षात घेता व्यापारी जहाजाच्या मदतीसाठी तात्काळ ‘आयएनएस कोलकाता’ तैनात करण्यात आले.

# शेतकऱ्यांसाठी दिल्लीतून खूशखबर

### १० दिवसांत होणार हिताचा मोठा निर्णय

## ऊस, साखर, कांद्याच्या प्रश्नांवर केंद्र सकारात्मक : मुख्यमंत्री

**नवी दिल्ली, मुंबई : प्रतिनिधी**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील मंत्रिमंडळ बुधवारी (दि. २७) शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी दिल्लीत बैठकीसाठी गेले होते. केंद्रीय गृह तथा सहकारमंत्री अमित शाह, केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्यासोबत या वेळी महत्त्वाची बैठक पार पडली. यात सकारात्मक चर्चा झाल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. अमित शाहांसोबत साखर कारखानदारी, ऊस उत्पादक, कांदा उत्पादकांच्या अडचणींबाबत बैठक होती. केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान, केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी हे उपस्थित होते. यावेळी साखरेच्या प्रश्नावर सकारात्मक चर्चा झाली. एमएसपी, इथेनॉलचा कोठा वाढवावा, वेल प्राईज सिस्टीम, लोन रिस्ट्रक्चरिंगआणि इंटरेस्ट सबमेन्शनचे पैसे देणे या प्रत्येक गोष्टीत सकारात्मक निर्णय अमित शाह यांनी दिला, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.

या सर्व प्रश्नांवर पुढील १० दिवसांत निर्णय घेण्याचे अमित शाह यांनी मान्य केल्याचे फडणवीस म्हणाले. एमएसपी वाढवणे गरजेचे आहे हे त्यांनी मान्य केले. इथेनॉलचा कोठा मोठ्या प्रमाणात वाढवण्याकरिता दोन महिन्यांत निर्णय करण्याचे त्यांनी मान्य केले. इंटरेस्ट सबमेन्शनचे पैसे तात्काळ देण्याचे मान्य केले. लोन रिस्ट्रक्चरिंगबाबत राज्य सरकारसोबत काम करून प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले. प्रायजिंगसंदर्भात प्रस्ताव मागवला आहे. तो प्रस्ताव आम्ही सादर करणार आहोत. तो मान्य झाल्यास साखर कारखानदारीचे अनेक प्रश्न सुटणार आहेत, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

नाफेड आणि एनसीसीएफने कांदा खरेदी सुरू केली आहे, ती बाजारामध्ये झाली पाहिजे. ती खरेदी व्यापाऱ्याकडून नाही तर शेतकऱ्यांकडून केली पाहिजे. त्याला मान्यता मिळालेली आहे.

# ‘भाजप देशाची विचारधारा घेऊन चालणारा पक्ष’

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे प्रतिपादन; जंगी पक्षप्रवेश



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप देशाची विचारधारा घेऊन चालणारा पक्ष आहे. प्रथम देश, नंतर पक्ष आणि त्यानंतर स्वतः अशी विचारसरणी असून सर्वांसाठी देशाची प्रगती सर्वांत महत्त्वाची आहे, असे प्रतिपादन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी बुधवारी (दि. २७) येथे केले.

मुंबई-गोवा महामार्गावर पनवेल तालुक्यातील शिरढोण गावाजवळ असलेल्या सुप्रसिद्ध अशा हॉटेल साईकृपेचे मालक आणि सामाजिक कार्यकर्ते जनार्दन वाकडीकर, जयेश वाकडीकर, हॉटेल एकवीराचे मालक श्याम वाकडीकर, मनोदय इंग्लिश स्कूलचे चेअरमन भगवान वाजेकर, महेश महाडिक, शंकर पवार, संतोष चौधरी, सुमित पवार, तुकाराम जळे, जितेंद्र जळे, अमर जळे, प्रवीण म्हात्रे, चेतन कर्णेकर, दिनेश भोपी, यश भोपी, कृष्णा भोपी, रोशन महाडिक, जगदिश महाडिक, दीपक महाडिक, जयेश महाडिक, महेश हरिभाऊ महाडिक, पंढरीनाथ महाडिक, धनाजी चौधरी, अर्जुन भोपी, शरद भोपी, प्रवीण भोपी, जनार्दन जळे, बाळाराम चौधरी, संतोष पाटील, राहुल पवार यांनी त्यांच्या अनेक समर्थकांसह भारतीय जनता पक्षात जाहीर पक्षप्रवेश केला.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार महेश बालदी, माजी नगराध्यक्ष व ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत मार्केट यार्ड येथे झालेल्या या सोहळ्यास प्रमुख मान्यवर म्हणून ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, युवा नेते प्रितम म्हात्रे, पंचायत समिती सदस्य राजेंद्र पाटील, वाहतूक संघटनेचे प्रभुदास भोईर, अ‍ॅड. राहुल घरत, अतुल घरत, माजी जिल्हा परिषद सदस्य ज्ञानेश्वर घरत, नगरसेवक विकास घरत, सरपंच राकेश गायकवाड, विश्वजित पाटील, माजी उपसरपंच प्रमोद कर्णेकर, विजय भोपी, श्याम पवार, अनंता भोपी, रोशन घरत, गिरीश मुकादम, गजानन घरत, राम वाजेकर, एकनाथ मुकादम, दत्ता मुकादम, मदन खारके, नारायण चौधरी, पांडुरंग चौधरी आदी पदाधिकारी आणि शिरढोण ग्रामस्थ उपस्थित होते.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, भारतीय जनता पक्ष हा केवळ निवडणूक लढवणारा पक्ष नसून राष्ट्रसेवेचे ध्येय घेऊन कार्य करणारी संघटना आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली देशाने विकास, आत्मनिर्भरता आणि जागतिक स्तरावर नवी ओळख निर्माण केली आहे. केंद्र सरकारच्या विविध योजनांमुळे सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडून आला असून गरीब, शेतकरी, महिला, युवक आणि वंचित घटकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम सरकारने केले असल्याचे त्यांनी नमूद केले. **(पान २...)**

# रामशेठ ठाकूर साहित्यिक आणि लोककलावंतांमध्ये रमणारे लोकनेते : ‘पानिपत’कार विश्वास पाटील

### ‘कोमसाप’ला लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून २५ लाखांची देणगी जाहीर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

साहित्यिक आणि लोककलावंतांमध्ये मनापासून रमणारे लोकनेते, असे गौरवोद्गार पानिपतकार तथा ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील यांनी पनवेल येथे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याविषयी काढले. कोकण मराठी साहित्य परिषद रायगड जिल्हा आणि नवीन पनवेल शाखेच्या वतीने कोमसापचे सल्लागार रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त “एक कृतार्थ संध्याकाळ” या विशेष साहित्यिक कार्यक्रमाचे आयोजन मंगळवारी (दि. २६) आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात करण्यात आले होते. त्याप्रसंगी प्रमुख मान्यवर म्हणून विश्वास पाटील बोलत होते.

या कार्यक्रमास कोमसापचे संस्थापक अध्यक्ष पद्मश्री मधु मंगेश कर्णिक, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर, ज्येष्ठ कवी व दिग्दर्शक रामदास फुटाणे, ज्येष्ठ कवी अशोक नायगावकर, कोमसापच्या अध्यक्षा नमिता कीर, कार्याध्यक्ष डॉ. प्रदीप ढवळ, साहित्यिक अरुण म्हात्रे, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, युवा नेते नगरसेवक परेश ठाकूर, महापौर नितीन पाटील, वाय. टी. देशमुख, उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे, सभापती रंजना वासकर, गझलकार ए. के. शेख, प्रा. एल. बी. पाटील, संदीप चव्हाण, प्रकाश बिनेदार, संजय गुंजाळ, गणेश कोळी यांसह लोकप्रतिनिधी, साहित्यिक, रसिक उपस्थित होते. **(पान २...)**

## माजी आमदार तनपुरे यांचा शनिवारी भाजप प्रवेश

**अहिल्यानगर : प्रतिनिधी**



विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अहिल्यानगर मतदारसंघातील उमेदवारीसाठी भाजपकडून माजी आमदार प्राजक्त तनपुरे यांचे नाव जवळपास निश्चित झाले असून, प्राजक्त तनपुरे यांचा ३० मे रोजी भाजप प्रवेश होणार आहे. भाजप पक्ष पदाधिकारी तसेच तनपुरे समर्थकांकडून याला दुजोरा मिळाला आहे. प्राजक्त तनपुरे हे शरद पवार गटाचे माजी प्रदेशाध्यक्ष आमदार जयंत पाटील यांचे भाचे आहेत. प्राजक्त तनपुरे हे राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचे माजी आमदार आहेत. त्यांच्या भाजप प्रवेशाची गेल्या काही दिवसांपासून चर्चा होत आहे, परंतु आता ते भाजपकडून विधान परिषदेची निवडणूक लढवणार असल्याचे तसेच त्यांचा भाजप प्रवेशाचा मुहूर्त ठरला आहे. भाजपच्या कार्यप्रणालीवर विश्वास असल्यानेच त्यांनी हा महत्त्वाचा निर्णय घेतला असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.

## निवडक

### उष्णतेच्या लाटेबाबत पंतप्रधान मोदींचे देशवासीयांना आवाहन

**नवी दिल्ली :** मोसमी पावसाने आगमनाची वर्दी दिली असली तरीही देशभरातील अनेक राज्यांत तापमानाचा पारा प्रचंड वाढला आहे. २५ मेपासून ‘नवतपा’ सुरू झाल्याने उष्णता वाढली आहे. परिणामी नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी स्वतःची काळजी घ्यावी, असे आवाहन थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून करण्यात आले आहे. त्यांनी यासंदर्भात बुधवारी (दि. २७) सोशल मीडियावरून पोस्ट केली आहे.

### ‘नीट’ प्रकरणात तेरावी अटक; पुण्यातीलही काही जण रडारवर

**पुणे :** ‘नीट’ पेपरफुटी प्रकरणात सीबीआयने पुण्यातील शिक्षक हर्षद शहा व लातूरमधील डॉ. मनोज शिरुरे यांना अटक केली. मुख्य सूत्रधार प्रा. पी. व्ही. कुलकर्णीला अटक करण्यात आली होती. डॉ. शिरुरे यांनी कुलकर्णी यांच्याकडून रसायनशास्त्राचे प्रश्न मिळविले होते. डॉ. शिरुरे यांची या प्रकरणात सीबीआयकडून चौकशी करण्यात आली होती. या प्रकरणात आतापर्यंत १३ जणांना अटक करण्यात आली आहे.

# माणगाव हादरले : अल्पवयीन मुलीची निर्घृण हत्या

**माणगाव : बातमीदार, प्रतिनिधी**



एका १५ वर्षीय मुलीची निर्घृण हत्या करून तिचा मृतदेह जंगलात फेकून दिल्याचा धक्कादायक प्रकार रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यात उघडकीस आला आहे. या घटनेने माणगाव परिसरात खळबळ उडाली आहे. माणगाव तालुक्यातील पळसगाव बुद्रुक ग्रामपंचायत हद्दीतील घरोशीवाडी येथे उतेकर कुटुंबीय उन्हाळी सुट्टीसाठी आले होते. निधी राकेश उतेकर ही १५ वर्षीय मुलगी सोमवार २५ मे रोजी रात्री नऊच्या सुमारास वडिलांच्या मोबाईलवर बोलत घरातून बाहेर पडली. ती परत घरी परतलीच नाही. सोमवार रात्रीपासून तिचा शोध सुरू होता. अखेर बुधवार २७ मे रोजी घरोशीवाडीच्या जंगलात एका मुलीचा मृतदेह सापडला. निधीच्या वडिलांना बोलावल्यानंतर हा धक्कादायक प्रकार उघड झाला.

निधी राकेश उतेकर ही कुटुंबासोबत विलेपार्ले येथे राहत होती. ती इयत्ता ९ वी उत्तीर्ण होऊन उन्हाळी सुट्ट्यांमुळे ८ दिवसांपूर्वी आई, वडील, भावासोबत गावी घरोशीवाडी येथे आली होती. ती विलेपार्ले येथील सेंट जेव्हियर्स शाळेत शिकत होती.जंगल भागात निर्जन स्थळी निधीचा मृतदेह सापडला आहे. प्राथमिक तपासात तिच्या अंगावर झालेल्या जखमा पाहता हा खून असल्याचा अंदाज आहे. तातडीने माणगाव पोलीस घटनास्थळी दाखल झाले. फॉरेन्सिक टीम व श्वान पथक घटनास्थळी पोहोचले असून माणगाव पोलीस सखोल तपास करत आहेत. माणगाव उपजिल्हा रुग्णालयात मृतदेह शवविच्छेदनासाठी ठेवण्यात आला असून शवविच्छेदनानंतर अधिक खुलासा होऊ शकतो.

# कमला एकादशीनिमित्त चार लाख भाविक पंढरीत

**पंढरपूर : प्रतिनिधी**



पुरुषोत्तम तथा अधिकमासातील कमला एकादशीच्या निमित्ताने पंढरपुरात सुमारे चार लाख भाविक दाखल झाले आहेत. अधिक मासातील एकादशी हा पर्वकाळाचा दिवस मानला जातो. विठ्ठलाचे पदस्पर्श दर्शन रांग गोपाळपूरपर्यंत पोहोचली असून दर्शनाला आठ ते १० तास लागत आहेत. एकादशीनिमित्त मंदिरात आकर्षक फुलांची आरास करण्यात आली आहे. दरम्यान, बकरी ईद सर्वत्र साजरी होत असताना पंढरपुरात हिंदू-मुस्लीम ऐक्याचे दर्शन घडले. दुसऱ्या दिवशी कुर्बानी देण्याचा निर्णय मुस्लीम बांधवांनी घेतला आहे.

अधिक महिन्यातील पर्वकाळाचा दिवस म्हणून एकादशीचा सोहळा ओळखला जातो. यानिमित्ताने पंढरपुरात भक्तांचा मेळा जमलाय. पहाटेपासून भाविकांनी चंद्रभागा स्नान, नगर प्रदक्षिणा, देवाचे दर्शन पूर्ण केले. चंद्रभागेला पुरेसे पाणी सोडल्याने भाविकांना स्नान करता आले. दर्शन रांगेत भाविकांना मोफत पाणी, चहा, उपवासाचे पदार्थ मंदिर समितीच्या वतीने देण्यात येत आहेत. पुणे येथील राम जांभुळकर यांनी दोन टन फुलांपासून विठ्ठल मंदिरात फुलांची सजावट केली आहे. मंदिर परिसर व पंढरी नगरी टाळ-मृदंगाच्या जयघोषाने दुमदुमून गेली आहे. एकीकडे पंढरीत हरिनामाचा जयघोष होत असताना मुस्लीम बांधवांनी हिंदू-मुस्लीम ऐक्याचे दर्शन घडवले. पंढरपुरातील मुस्लीम नागरिकांनी बकरी ईदची कुर्बानी न देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला.

पंढरपुरात वारकरी संप्रदायाला मांस वर्ज्य आहे. त्यामुळेच विठ्ठलभक्त असणाऱ्या मुस्लीम बांधवांनी बकरी ईद उद्या साजरी करण्याचा निर्णय घेतला. नमाजासह सर्व धार्मिक कार्यक्रम उद्याच करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे इब्राहीम बोहरी यांनी सांगितले. दरम्यान, हिंदू-मुस्लीम ऐक्य या वेळी प्रकर्षाने पाहायला मिळाले.



# एसटी विभागांना नफ्याकडे नेण्यासाठी प्रत्येक विभागासाठी ‘पालक अधिकारी’ नियुक्त होणार

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सातत्याने तोट्यात चालणाऱ्या विभागांना आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि नफ्यात आणण्यासाठी व्यापक उपाययोजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला असून, प्रत्येक तोट्यातील विभागासाठी प्रादेशिक व्यवस्थापक दर्जाच्या अथवा त्यापेक्षा वरिष्ठ अधिकाऱ्यांची ‘पालक अधिकारी’ म्हणून नियुक्ती करण्यात येणार असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

ते या अनुषंगाने एसटी महामंडळाच्या मुख्यालयात बोलाविण्यात आलेल्या बैठकीत बोलत होते. या बैठकीला मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी श्रीमती प्रियंका नारनवरे, वित्तीय सल्लागार गिरीश देशमुख यांच्या सह सर्व खाते प्रमुख व प्रादेशिक व्यवस्थापक उपस्थित होते.

एसटी महामंडळाची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी केवळ उत्पन्नवाढ नव्हे तर खर्च नियंत्रण, इंधन बचत, महसूल गळती रोखणे आणि प्रशासकीय शिस्त यांचा एकत्रित विचार करून ही कार्यपद्धती राबविण्यात येणार आहे. यासाठी संबंधित पालक अधिकाऱ्यांवर विभागाच्या आर्थिक प्रगतीची थेट जबाबदारी निश्चित करण्यात येणार आहे.



यानुसार प्रत्येक महिन्याच्या पहिल्या आठवड्यात संबंधित विभागाची आढावा बैठक घेण्यात येईल. या बैठकीत मागील महिन्याच्या उत्पन्न-खर्चाचा सखोल आढावा घेऊन चालू महिन्यासाठी ठोस नियोजन करण्यात येणार आहे. तसेच आगारनिहाय उत्पन्नाचे स्पष्ट उद्दिष्ट निश्चित करून त्याची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात येणार आहेत.

एसटीचे उत्पन्न वाढविण्यासोबतच खर्चात बचत करण्यावरही विशेष भर देण्यात येणार आहे. विशेषतः डिझेल बचतीसाठी प्रत्येक आगाराला जबाबदारी निश्चित करण्यात येणार असून, सातत्याने डिझेल बचत करणाऱ्या आगारांना प्रोत्साहनपर बक्षीस योजना जाहीर करण्यात येणार आहे.

इंधन बचत हीच एसटीसाठी अतिरिक्त उत्पन्न निर्मिती असल्याची भूमिका महामंडळाने स्पष्ट केली आहे. महसूल गळती रोखण्यासाठी सुरक्षा व दक्षता विभागालाही अधिक सक्रिय करण्यात येणार आहे. उत्पन्न बुडविणाऱ्या अथवा तिकिट व्यवहारात अनियमितता करणाऱ्या वाहकांची स्वतंत्र यादी तयार करून त्यांच्यावर सातत्याने लक्ष ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. प्रवाशांचा महसूल हा एसटीचा कणा असून त्यामध्ये कोणतीही तडजोड सहन केली जाणार नसल्याचे मंत्री सरनाईक यांनी स्पष्ट केले.

अति कालीन भत्त्याच्या संदर्भातही कठोर आर्थिक शिस्त लागू करण्यात येणार असून, वित्त विभागाने निश्चित केलेल्या निकषांनुसारच अतिरिक्त काम व भत्त्यांना मंजुरी दिली जाणार आहे. अनावश्यक आर्थिक भार टाळण्यासाठी सर्व विभागांना दक्षता बाळगण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

एसटीच्या मालमत्तांमधून अधिकाधिक महसूल मिळविण्यासाठी प्रत्येक बसस्थानकावरील व्यावसायिक आस्थापनांची तपासणी करण्यात येणार आहे. सर्व दुकाने व आस्थापना कार्यरत असल्याची खात्री करून त्यांच्याकडून नियमित व योग्य भाडेवसुली करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. रिक्त जागा तातडीने भाडेतत्त्वावर देऊन महसूल वाढविण्यावर भर राहणार आहे.

तसेच प्रत्येक बसस्थानकावर सकाळच्या सत्रात ‘इशू अँड स्टार्ट’ उपक्रम काटेकोरपणे राबविण्यात येणार असून, बस सुटण्यापूर्वी प्रवाशांना तिकीट वितरणाची प्रक्रिया व्यवस्थित पार पडते की नाही यावर देखरेख ठेवली जाणार आहे. वाहकांचा इतर प्रशासकीय किंवा गैर-वाहतूक कामांसाठी होणारा वापर तातडीने थांबविण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. वाहक हे एसटीच्या महसूल व्यवस्थेतील अत्यंत महत्त्वाचे घटक असून त्यांचा मूळ कामासाठीच प्रभावी उपयोग व्हावा, यावर महामंडळाचा भर राहणार आहे.

# रायगडमध्ये अल्पवयीन मुलांचे अपहरण वाढले

## १४ महिन्यांत १५५ घटना; ७७ टक्के मुली

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यातील विविध पोलिस ठाण्यांच्या हद्दीत जानेवारी ते डिसेंबर २०२५ या वर्षात एकूण ११५ अपहरणांचे गुन्हे दाखल झाले असून यामध्ये ४१ मुले व ८३ मुलींचा समावेश आहे.तर जानेवारी ते एप्रिल २०२६ या चार महिन्यात ४० अपहरणाचे गुन्हे दाखल असून यात ७ मुले व ३६ मुलींचा समावेश आहे. गेल्या चौदा महिन्यात एकूण १५५ अल्पवयीनांचे अपहरण झाले आहे. त्यात ७७ टक्के मुली आहेत.

गेल्या काही वर्षांत अल्पवयीन मुलांचे अपहरण होण्याच्या घटनांमध्ये वाढ झाल्याने पालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. कौटुंबिक वाद, ऑनलाईन पैशांचे अमिष, इतर प्रलोभने या कारणांमुळे गेल्या काही वर्षात अल्पवयीन मुलांचे अपहरण होण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे.

अनेक वेळा अल्पवयीन मुलींना प्रेम, विवाह किंवा उज्ज्वल भविष्याची स्वप्ने दाखवून पळवून नेण्याच्या घटनांचे प्रमाण मोठे आहे. तर मुलांनाही नशा, पैशांचे अमिष दाखवून अपहरण केले जाते. मुलांना भीक मागण्यास भाग पाडणे किंवा अवैध कामांसाठी अशा अपहरणांचा वापर केला जातो. रायगड जिल्ह्यातील विविध पोलिस ठाण्यांमध्ये जानेवारी ते डिसेंबर २०२५ या वर्षात एकूण ११५ अपहरणाचे गुन्हे दाखल झाले असून यामध्ये ४१ मुले व ८३ मुलींचा समावेश आहे.

तर जानेवारी ते एप्रिल २०२६ या चार महिन्यात ४० अपहरणाचे गुन्हे दाखल असून यात ७ मुले व ३६ मुलींचा समावेश आहे. जानेवारी ते डिसेंबर २०२५ या वर्षात सर्वाधिक १५ गुन्ह्यांची नोंद पेणमध्ये त्याखालोखाल खोपोली १४, रसायनी १२, कर्जत ११ व माणगाव ९ यानंतर इतर पोलिस ठाण्यांमध्ये नोंद झाली आहे.

त्याचप्रमाणे जानेवारी ते एप्रिल २०२६ या चार महिन्यांत खोपोलीमध्ये ८, खालापूर ५, अलिबाग व माणगाव प्रत्येकी ३ त्याखालोखाल इतर पोलिस ठाण्यांमध्ये नोंद झाली आहे.

२०२५ मध्ये अपहरण झालेल्या मुलांपैकी १२२ मुलांना शोधण्यात पोलिसांना यश आले आहे. तर जानेवारी ते एप्रिल २०२६ या काळात अपहरण झालेल्या ३९ मुलांना शोधण्यात पोलिसांना यश आले आहे. मुलांच्या अपहरण होण्याच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने पालकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे.

अल्पवयीन मुले व मुलींच्या अपहरणाच्या घटना दिवसेंदिवस वाढत असून मुलींना लग्नाचे आमिष दाखविल्यामुळे त्या घर सोडून गेल्याचे निदर्शनास येत आहे. घरातील भांडणांमुळेही लहान मुले, मुली घर सोडून जात आहेत. पालकांनी समजावून सांगितलेले मुले ऐकत नाहीत. घर सोडण्यास तयार होणा-या या मुलांना समुपदेशनाची अत्यंत गरज आहे. योग्य समुपदेशन केल्यास यामधील बहुतांश घटना कमी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# किनारी सुरक्षेसाठी समन्वय यंत्रणा अधिक सक्षम करणार -मंत्री नितेश राणे

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्राचा विस्तीर्ण समुद्रकिनारा लक्षात घेता किनारी सुरक्षा अधिक सक्षम करणे ही काळाची गरज आहे. राज्यातील सर्व संबंधित यंत्रणांमध्ये समन्वय वाढवून आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने सागरी सुरक्षा व्यवस्था अधिक मजबूत करण्यात येईल. मच्छीमार, किनारी भागातील नागरिक आणि सागरी वाहतुकीची सुरक्षितता



सुनिश्चित करण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध असल्याचे मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी सांगितले.

मंत्रालयात सागरी किनारीपट्टी सुरक्षेच्या अनुषंगाने आयोजित बैठकीत मंत्री राणे बोलत होते. यावेळी मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव रामास्वामी एन, महाराष्ट्र सागरी मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप पी. मत्स्यव्यवसाय आयुक्त प्रेरणा देशभ्रतार, महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक प्रकाश खपले यांच्यासह विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

राज्यातील किनारी सुरक्षेची यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी विविध विभागांमध्ये प्रभावी समन्वय वाढविणे, सागरी गस्त अधिक बळकट करणे तसेच पोलीस विभागासाठी आवश्यक जेट्टी सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत राज्य शासन गंभीर असल्याचे मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी सांगितले.

# मांडवी, तेजस, मत्स्यगंधासह अनेक गाड्यांच्या वेळेत रेल्वेकडून १५ जूनपासून मोठे बदल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोकण रेल्वे मार्गावर प्रवास करणाऱ्या लाखो प्रवाशांसाठी पावसाळ्याचा विचार करून १५ जून २०२६ ते २० ऑक्टोबर २०२६ या कालावधीत कोकण रेल्वेवर विशेष मान्सून वेळापत्रक लागू करण्यात येणार आहे. या निर्णयामुळे मुंबई-गोवा मार्गावरील अनेक महत्त्वाच्या एक्सप्रेस गाड्यांच्या वेळा पत्रकात बदल होणार आहे.या बदलाचा फटका कोकणकन्या एक्सप्रेस, तेजस एक्सप्रेस, जनशताब्दी एक्सप्रेस, मांडवी एक्सप्रेस, मत्स्यगंधा एक्सप्रेस आणि मंगळुरू एक्सप्रेस यांसारख्या लोकप्रिय गाड्यांना बसणार आहे. त्यामुळे प्रवाशांनी प्रवासाचे नियोजन करताना वेळापत्रक तपासणे अत्यावश्यक ठरणार आहे.

मुसळधार पाऊस, रुळांवर पाणी साचणे, झाडे पडणे आणि दरड कोसळण्याच्या शक्यतेमुळे रेल्वे प्रशासन दरवर्षी मान्सूनवेळी रेल्वेच्या वेळपत्रकात बदल करते. यावेळीही वेळपत्रकात बदल करण्यात आले आहेत. त्यामुळे काही गाड्या उशिराने धावतीलकोकण रेल्वे प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, १५ जून ते २० ऑक्टोबरदरम्यान मूळ स्थानकातून सुटणाऱ्या गाड्यांनाच हे वेळापत्रक लागू असेल. विविध गाड्यांच्या सुधारित वेळांची माहिती स्वतंत्र परिशिष्टाद्वारे जाहीर केली जाणार आहे. ती स्थानकांवरील सूचना फलक, सार्वजनिक उद्घोषणा प्रणाली आणि अधिकृत माध्यमांतून उपलब्ध करून दिली जाईल.दरम्यान, मान्सूनपूर्व दुरुस्ती आणि पायाभूत सुविधांच्या सुधारणांची कामे सुरू आहेत.

त्यामुळे कोकण रेल्वे मार्गावरील अनेक गाड्या सध्या ३ ते ४ तास उशिराने धावत आहेत. तसेच मुंबईतील सीएसएमटी आणि एलटीटी स्थानकांवरील काही गाड्यांचे लास्ट स्टेशनही बदलण्यात आले आहेत. त्यामुळे प्रवाशांनी प्रवासापूर्वी रेल्वेच्या अपडेट्स तपासूनच घराबाहेर पडावे,

# सानपाडा येथे ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत आरोग्य शिबिर संपन्न

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिकाच्या आरोग्य विभागातर्फे तसेच सानपाडा ज्येष्ठ नागरिक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने २७ मे २०२६ रोजी विरंगुळा केंद्रात ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले.



या आरोग्य शिबिरामध्ये ज्येष्ठ नागरिकांची शुगर, बीपी, एक्स-रे तसेच थुंकी तपासणी तज्ञ डॉक्टरांकडून करण्यात आली. शिबिराला ज्येष्ठ नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. याप्रसंगी संघाचे अध्यक्ष मारुती विश्वासराव, सचिव जगदीश एकावडे, उपाध्यक्ष सीमा बोराडे, सहसचिव राजेंद्र कदम, डॉक्टर, परिचारिका तसेच ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या उपक्रमामुळे ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याबाबत जनजागृती होण्यास मदत झाली असून उपस्थितांनी आयोजकांचे कौतुक केले.

# माथेरान मिनीट्रेनसाठी लवकरच नवीन इंजिन्सची मागणी

**माथेरान : बातमीदार**

माथेरानची शान समजल्या जाणाऱ्या मिनीट्रेनच्या वाढीव फेऱ्यांसाठी नवीन इंजिन्स जोपर्यंत उपलब्ध होत नाहीत तोपर्यंत नेरळ माथेरान मधील या ट्रेनच्या फेऱ्यात वाढ होऊन पर्यटन खऱ्या अर्थाने बहरू शकत नाही.यासाठी लवकरच नवीन इंजिन्स उपलब्ध व्हावी या आशयाचे निवेदन विद्यमान नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांनी मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांना दिले





माथेरान हे एक जागतिक दर्जाचे पर्यटनस्थळ असून नेरोगेजवर धावणारी माथेरानची मिनिट्रेन हे येथील एक प्रमुख आकर्षण आहे.सध्या स्थितीत माथेरान ते नेरळ आणि नेरळ ते माथेरान अश्या फक्त दोनच फेऱ्या सुरू आहेत.पर्यटकांचे वाढते आकर्षण पाहता या फेऱ्यांमध्ये वाढ होणे आवश्यक आहे.तसेच अमन लॉज ते माथेरान स्टेशन दरम्यान जी शटल सेवा सुरू आहे.यामध्ये दोन मालवाहू बोग्या असून एक बोगी प्रथम दर्जा तर दोन बोग्या द्वितीय श्रेणीच्या आहेत. शटल मधून मोठ्या प्रमाणावर पर्यटकांची ये जा सुरू असते परंतु तीस आसनी बोग्यांमध्ये जागे अभावी तिकीट उपलब्ध होत नसल्याने पर्यटकांचा हिरमोड होत आहे.यासाठी आणखीन दोन द्वितीय श्रेणीच्या बोग्या लावण्यात याव्यात.

अमन लॉज पासून माथेरान स्टेशन पर्यंतचा मार्ग हा अवघड घाट सेक्शन मध्ये येत नाही.या रेल्वेच्या बाजूला टाकलेली खडी सततच्या रहदारीमुळे विस्कळीत होऊन पसरली जाते त्यासाठी या रेल्वेच्या दुतर्फा पेव्हर ब्लॉक लावून चालण्यायोग्य मार्ग केल्यास सर्वांना सोयीचे ठरू शकते.माथेरानला बांधकाम साहित्य मनुष्यबळाच्या वाहतूक व्यवस्थेमुळे खूपच महाग मिळते यासाठी नेरळहून पूर्वी मालगाडी सुरू होती ती पुन्हा एकदा सुरू करण्यात यावी.जेणे करून सर्वसामान्य लोकांना स्वस्तात सामान उपलब्ध होऊ शकते असेही नगराध्यक्ष यांनी निवेदनात नमूद केले आहे.

हेरिटेज दर्जा प्राप्त झालेल्या मिनिट्रेनची सेवा सर्वांना उपलब्ध होणे गरजेचे आहे.या ट्रेनची सफर करण्यासाठी देशविदेशातील पर्यटक इथे हजेरी लावतात.नवीन इंजिन्स उपलब्ध झाल्यास निश्चितच या गाडीच्या फेऱ्या सुध्दा वाढतील त्यामुळे पर्यटन वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.खासदार श्रीरंग बारणे यांचे यातून मार्ग काढतील .

## पान १ वरुन

### ‘भाजप देशाची विचारधारा घेऊन चालणारा पक्ष’





देशाच्या प्रगतीमध्ये प्रत्येक कार्यकर्त्याची भूमिका महत्त्वाची असून समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शासनाच्या योजना पोहचवण्यासाठी कार्यकर्त्यांनी समर्पित भावनेने कार्य केले पाहिजे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. राष्ट्रहिताला सर्वोच्च प्राधान्य देत समाजसेवा आणि जनसंपर्काच्या माध्यमातून सर्वांनी एकजुटीने काम करावे, असेही ते म्हणाले. तसेच आज प्रवेश झाला आहे ती मंडळी आपल्या स्व:कर्तृत्वाने व्यवसायात यशस्वी झाले आहेत याचा मनापासून आनंद आहे, असेही लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अधोरेखित केले.


### रामशेठ ठाकूर साहित्यिक आणि लोककलावंतांमध्ये रमणारे लोकनेते : ‘पानिपत’कार विश्वास पाटील

विश्वास पाटील म्हणाले, तळ्यांनी आणि कमळांनी फुलून-उमलून आलेले गाव म्हणजे पनवेल आणि या पनवेल गावातील सुवर्णकमळ हे रामशेठ ठाकूर आहेत. निष्ठेने माणूस मोठा होतो, त्याचे कर्तृत्वही मोठे असते. रामशेठ ठाकूर हे गरिबीतून वर आलेत. आपल्या गरिबीचे नाद, निनाद, स्पंद आणि त्या हाका, ती जाणीव ही सगळी आपल्या हृदयात आहे, ती अशीच ठेवावी. गोरगरिबांच्या सेवेत नेहमी तुम्ही सहभागी होता, ही अशीच सेवा यापुढेही सुरू ठेवावी. मधु मंगेश कर्णिक यांनी रामशेठ ठाकूर यांचे कर्तृत्व, दातृत्व आणि नेतृत्व पाहता त्यांना लोकनेता नाही तर समाजनेता म्हटले पाहिजे. ज्या समाजात मी जन्माला आलो त्या समाजाचे कल्याण झाले पाहिजे, त्या समाजाचे भवितव्य घडले पाहिजे ही आकांक्षा रामशेठ ठाकूर यांच्या मनामध्ये आहे, असे सांगून अमृत महोत्सवी वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. रामदास फुटाणे म्हणाले, बहुजनांच्या मुलांनी, तरुणांनी कसा संघर्ष केला पाहिजे याचे उत्तम उदाहरण म्हणजे रामशेठ ठाकूर. पनवेलची महत्त्वाची ओळख म्हणजे रामशेठ ठाकूर. त्यांच्या स्वभावाची नम्रता आपण बाकी जणांनी स्वीकारली पाहिजे हा त्यांचा महत्त्वाचा गुण आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भाषणात सांगितले की, साहित्य समाज घडवण्याचे काम करते. साहित्यिक स्फूर्ती देतात, उभारी देतात. साहित्यिकांच्या शुभेच्छांमुळे निश्चितच माझे आयुष्य वाढेल. आयुष्यात गरिबी, श्रीमंती, कष्टाचे अनुभव मी पाहिले आहेत. रयत शिक्षण संस्थेमुळे संस्कार मिळाले. आपण प्रामाणिकपणे काम केले तर एक यशस्वी नागरिक होऊ शकतो. लोकांनी मला रामशेठ बनवले, पण मी अजूनही रामशेठ झालो नाही. पैसे कमवले पण वृत्तीने आणि भावनेने मी शेठ झालो नाही. साहित्यिकांमुळे मी कृतार्थ झालो. यावेळी त्यांनी कोकण मराठी साहित्य परिषदेसाठी २५ लाखांची देणगी जाहीर केली. यावेळी अशोक नायगावकर, अरुण म्हात्रे, डॉ. प्रदीप ढवळ यांची भाषणे झाली.

गणेश कोळी यांनी संपादन केलेल्या लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या जीवन प्रवासावरील ७५ कवितांचा ‘लोकनेता’ या प्रातिनिधीक काव्यसंग्रहाचे प्रकाशन झाले. तसेच शुभांगी म्हात्रे यांच्या ‘काव्यश्री’ आणि डॉ. शैलजा करोडे यांच्या ‘मेंदीच्या पानावर’ या काव्यसंग्रहाचे प्रकाशन झाले. मान्यवरांच्या हस्ते लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे अभीष्टचिंतन करण्यात आले. प्रास्ताविक गणेश कोळी यांनी, तर आभार प्रा. चंद्रकांत मढवी यांनी मानले. सूत्रसंचालन कुणाल रेगे यांनी केले.

## दुखवटा

### विश्वनाथ घुडे



**कर्जत** : तालुक्यातील रजपे गावातील राहिवासी कर्जत कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक विश्वनाथ पांडुरंग घुडे यांचे अल्पशा आजाराने वयाच्या ८८ व्या वर्षी निधन झाले. ते टेंभरे ग्रामपंचायतीचे पंधरा वर्ष सरपंच पदी होते. पंचायत समितीचे स्वीकृत सदस्यपद सुद्धा सांभाळले होते. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक कन्या, सूना, जावई, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे

### शिवाजीराव चव्हाण



**चौक:** खालापूर (जि. रायगड) चे तहसीलदार अभय चव्हाण यांचे वडील मुळज ता. उमरगा येथील मूळ रहिवासी भूविकास बँकेचे माजी शाखाधिकारी शिवाजीराव दत्तात्रय चव्हाण (वय ७९ वर्षे) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले..त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगे अभय चव्हाण (तहसीलदार, खालापूर) व सुरज चव्हाण, तसेच भाऊ, बहिणी, सुना आणि नातवंडे असा मोठा आप्तपरिवार आहे.

# बकरी ईद सणासाठी महापालिकेचे चोख नियोजन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात दिनांक २८ मे २०२६ ते ३० मे २०२६ दरम्यान बकरी ईद सण साजरा करण्यात येणार असून, सदर सणाच्या पार्श्वभूमीवर महापौर नितीन पाटील व आयुक्त मंगेश चितळे यांनी दिलेल्या सूचनांनूसार आवश्यक पूर्वतयारी व नियोजन पुर्ण झाले आहे.

महापालिका मुख्यालयात झालेल्या बैठकीत मा. महापौरांनी दिलेल्या सूचनांनूसार तात्पुरत्या कत्तलखान्यांसाठी शासनाकडून प्राप्त सूचनांचे, कायदे व नियम, तसेच उच्च न्यायालयाच्या आदेशाचे काटेकोर पालन केले जात आहे. कुर्बानीनंतर निर्माण होणाऱ्या अवशेषांची योग्य विल्हेवाट लावणेबाबत कामी महापालिकेच्या स्वच्छता निरीक्षकांना विशेष सूचना देण्यात आल्या आहेत.

याकरीता प्रभाग २ साठी स्वच्छता निरीक्षक अजिंक्य दळवी ( मो.नं ७७१००८५००५) , प्रभाग ३ साठी स्वच्छता निरीक्षक कुणाल गायकवाड ( मो नं ९८२०३७३१७१) तसेच प्रभाग १४ साठी स्वच्छता निरीक्षक साठी मिथुन पवार (७०२१७९१३२६) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच सणाच्या पार्श्वभूमीवर स्वच्छता व नियोजनासाठी प्रभागवार संबधित अधिकारी व स्वच्छता निरीक्षकांची नियुक्ती करण्यात आली असून यांची यादी वेबसाईट तसेच सोशल मिडीयावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

बकरी ईद सणाच्या अनुषंगाने मांस वाहतूक करताना स्वच्छता व सुरक्षिततेचे नियम पाळणे आवश्यक आहे तसेच नियमांचे उल्लंघन झाल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल असे महापालिकेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले.

महानगरपालिकेमार्फत बकरी ईद सण शांततापूर्ण, स्वच्छ व सुव्यवस्थित वातावरणात पार पाडण्यासाठी सर्व विभागांना आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. पोलिस बंदोबस्त तसेच स्वच्छता निरीक्षकांमार्फत स्वच्छता व्यवस्था ठेवण्यात येत आहे, मागील वर्षीप्रमाणेच या वर्षीदेखील प्रशासनाकडून चोख व्यवस्था करण्यात आली आहे.

# डिझेल चोरीच्या कथित रॅकेटचा पोलिसांनी केला पर्दाफाश

**पनवेल : वार्ताहर**

महाराष्ट्राच्या किनारपट्टीवर चालणाऱ्या डिझेल चोरी आणि कर चुकवेगिरीच्या संशयित रॅकेटप्रकरणी ठाणे पोलिसांनी कथित इंधन तस्करी करणारा राजू पंडित आणि त्याच्या अनेक साथीदारांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. नुकताच एफआयआर दाखल करण्यात आला असून, जप्त केलेले डिझेल पाईपलाईनमधून किंवा समुद्रातील मालवाहू जहाजांमधून चोरले गेले असावे, असा तपास अधिकाऱ्यांना संशय आहे. पोलिसांच्या सूत्रांनुसार, आरोपींनी लहान बोटींचा वापर करून मोठ्या जहाजांमधून डिझेल चोरले आणि ते किनाऱ्यावर आणले,

जिथे ते टँकरमध्ये भरून राज्यभरात बेकायदेशीरपणे विकले जात होते. अधिकाऱ्यांचा असा विश्वास आहे की, या कारवायांमुळे कथित करचुकवेगिरी आणि काळ्या बाजारातील इंधन विक्रीतून सरकारी महसुलाचे मोठे नुकसान झाले आहे. पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले की, या प्रकरणात राजू पंडित आणि इतर अनेक आरोपींची नावे असून, इंधनाचा स्रोत निश्चित करण्यासाठी आणि या कारवाईतील अतिरिक्त दुवे शोधण्यासाठी पुढील तपास सुरू आहे.

महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्याशी (MCOCA) संबंधित पूर्वीच्या प्रकरणांमध्ये लादलेल्या अटींच्या कथित उल्लंघनाबद्दलही अधिकाऱ्यांनी चिंता व्यक्त केली आहे.

## निवडक

### महिलेसोबत अश्लील वर्तन

**नवीन पनवेल :** घरी चालत जात असलेल्या महिलेला धक्का देऊन तिच्या सोबत अश्लीलवर्तन केल्याप्रकरणी कौशल राम चौधरी (राहणार छोटा खांदा गाव) याच्या विरोधात कामोठे पोलीस ठाण्यात २५ मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. यातील फिर्यादी पीडित महिला या २५ मे रोजी धाकटा खांदा गावातील गणपती मंदिरासमोरील रस्त्यावरून घरी पाय चालत जात होत्या. यावेळी आरोपीने त्यांना धक्का मारला आणि त्यांच्यासोबत अश्लील वर्तन केले. त्यानंतर त्यांना शिवीगाळ करत दमदाटी केली.

### अपघातात एकाचा मृत्यू

**नवीन पनवेल :** रिक्षा आणि ट्रकच्या झालेल्या अपघातात रिक्षा चालक मोरेश्वर अनंता सोनावळे (राहणार ठोंबरेवाडी, पोयंजे) यांचा मृत्यू झाला. या अपघाताप्रकरणी ट्रक चालकाविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.२६ मे रोजी पावणे बाराच्या सुमारास ट्रक चालक याने वाहनातील डिझेल संपल्याने ट्रक रस्त्यावर उभा केला होता. यावेळी पार्किंग लाईट दिली नव्हती. यावेळी रिक्षा चालक मोरेश्वर सोनावळे यांनी थांबलेल्या ट्रकला पाठीमागून धडक दिली. या अपघातात त्यांचा मृत्यू झाला.

### मोबाईलची चोरी

**नवीन पनवेल :** रेल्वेने प्रवास करत असताना फटका मारून मोबाईल फोन चोरून नेल्याची घटना ऊसरली रेल्वे फाटकाच्या आधी घडली. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात २६ मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. सार्थक भोसले (राहणार दिघा, नवी मुंबई) हे पनवेल ते खेड असा तुतारी एक्सप्रेसने प्रवास करत होते. यावेळी ६४ हजार रुपये किमतीचा मोबाईल फोन त्यांच्या हातात होता. आरोपीने अंधारात झुडपात उभे राहून त्यांच्या हातावर काठीने फटका मारला आणि त्यांचा मोबाईल खाली पाडून चोरून नेला.

### आठ लाख तीन हजारांची फसवणूक

**नवीन पनवेल :** बिल न भरल्याने गॅस कनेक्शन कट करण्यात येणार असल्याचा मेसेज पाठवून फोनचा एक्सेस स्वतःकडे घेऊन आठ लाख तीन हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी चार जणांविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात २६ मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. सुरेंद्र दत्तात्रय साळवी हे सेक्टर १५, नवीन पनवेल येथे राहत असून त्यांना आरोपींनी महानगर गॅसचे मागील बिल भरलेले नसल्याने त्यांचे कनेक्शन कट करण्यात येणार असल्याचा व्हाट्सअप वर खोटा मेसेज पाठवला. आणि ते अपडेट करण्याचा बहाणा करून त्यांना फाईल पाठवली. साळवी यांनी ती फाईल ओपन केली असता त्यांच्या फोनचा एक्सेस आरोपी यांनी स्वतःकडे घेतला आणि त्यांची आठ लाख तीन हजार रुपयांची आर्थिक फसवणूक केली.

### विवाहिता बेपत्ता

**पनवेल :** ३८ वर्षीय विवाहित महिला ही घरातुन जाताना मी केटर्सचे काम करण्यासाठी जात आहे असे सांगुन निघुन गेली ती अद्याप घरी न परतल्याने ती हरविल्याची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. तालुक्यातील घोटगाव कोयनावेळी येथे राहणारी काजल सुभाष सिंग वय ३८ वर्षे, रंग सावळा, उंची ५ फुट, भाषा हींदी अवगत असून ती सोबत मोबाईल फोन घेऊन बेपत्ता झाली आहे . या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी तळोजा पोलीस ठाणे यांच्याशी संपर्क साधावा.



# करंजा मच्छीमार बंदरातून ३० ते ३५ हजार मेट्रिक टन मासळीची निर्यात

**उरण : वार्ताहर**

पावसाळी बंदीमुळे करंजा बंदरातील मासळी निर्यात बाजार ही बंद झाला आहे. या करंजा मच्छिमार बंदरातून २०२५ मध्ये ३० ते ३५ हजार मेट्रिक टन इतक्या मासळीची निर्यात झाली असून ही राज्यातील निर्यातीच्या १० टक्के निर्यात आहे. यावर्षी अनेक कारणांमुळे मासळीची आवक कमी असली तरीही निर्यातीत मात्र वाढ झाली असल्याची माहीती मासळी निर्यातदारांनी दिली आहे.

करंजा बंदर हे देशातील सर्वात मोठे मासळी निर्यातीचे हब बनू पहात आहे. यात अरबी समुद्रातून पकडलेल्या रिबन फिश,कटल, माकोल,नळ, कुपा, बांगडा आदी प्रकारच्या मासळीची निर्यात युरोप,थायलंड,व्हिएतनाम ,हाँगकाँग,सिंगापूर, मिडल ईस्ट आधी भागात पोहचली आहे. नव्याने निर्माण झालेल्या करंजा मच्छीमार बंदरातून बंदरातून ६०० कोटींपेक्षा अधिकची निर्यात केली जात आहे. यावर्षी बंदरातून ३० ते ३५ मेट्रिक टन मासळीची निर्यात करण्यात आली असल्याची माहिती निर्यातदारांनी दिली आहे.

ही मासळी अमेरिका,चीन थायलंड तसेच आशिया वन युरोप खंडातील अनेक देशात निर्यात करण्यात आली आहे. तर दुसरीकडे मासळी बंदर आणि त्यावर आधारित विविध प्रकल्पांमुळे करंजा परिसरात विविध प्रकारच्या छोट्या-मोठ्या लघु उद्योगात वाढ झाली आहे.त्यामुळे बंदरातील ४५० मासेमारी बोटी,त्यावर आधारित २ हजार कुटुंबाना लाभ होणार आहे. त्याचप्रमाणे या बंदरामुळे

येथील स्थानिक बेरोजगारांना बऱ्यापैकी रोजगारही उपलब्ध होऊ लागला आहे. मुंबईच्या ससून बंदराला पर्याय म्हणून उरणच्या करंजा येथे नवे मच्छिमार बंदर उभारण्यात आले आहे. त्यामुळे येथील मच्छिमारांना लाभ झाला आहे. त्याच बरोबरीने स्थानकांच्याही व्यवसायात भर पडली आहे.

प्रामुख्याने कोळी आगरी बांधवांचीच सर्वाधिक वस्ती आहे.यामुळे मासेमारी व्यवसाय करणे ओघाने आलेच.मोठ्या प्रमाणावर पारंपारिक पध्दतीने व्यवसाय करणाऱ्या मच्छीमारांमुळे राज्यातील सात सागरी जिल्ह्यातील सर्वात मोठे मच्छीमार करंजा गाव म्हणून ओळखले जाते.राज्यातील सर्वाधिक सुमारे ४५० मच्छीमार बोटी याच करंजा गावात मासेमारी करतात.राज्यातील सर्वात मोठी मच्छीमार सहकारी संस्थांही करंजातच आहे.वार्षिक सुमारे १०० कोटींची उलाढाल असलेल्या या मच्छीमार संस्थेच्या माध्यमातून डिझेल पुरवठा केला जात आहे.मच्छीमारांसाठी लागणारे साहित्य किफायतशीर दरात उपलब्ध करून देण्यासाठी दुकानही सुरू आहेत.

मच्छीमारांच्या शेकडो बोटी मासळी उतरविणे, विक्रीसाठी मुंबईतील एकमेव ससुनडॉक बंदराच्या आश्रयाला जात होते.त्यामुळे ससुनडॉक बंदरावरील वाढता ताण लक्षात घेऊनच करंजा येथेच उपयुक्त जागेत सुमारे ३०० कोटी खर्चाचे एक हजार मच्छीमार बोटी क्षमतेचे अद्यावत करंजा मच्छीमार बंदर उभारण्यात आले आहे. याआधीच मच्छीमारांसाठी आवश्यक लागणारे साहित्य पुरवठा करणारे हार्डवेअर,२०-२५ वर्कशॉप्स,जाळींची दुकाने आहेत.करंजा येथुन मच्छीमार बोटींसाठी लागणारे पंखे,टनट्युब, सॉफ्ट आदी यांत्रिक साहित्याला विदेशातून मोठी मागणी आहे.

> *करंजा मच्छिमार बंदरावर २०२५ च्या मासळी हंगामात ३० ते ३५ मेट्रिक टन मासळी उतरविण्यात आली असून ही राज्यात उतरवण्यात आलेल्या एकूण मासळीच्या १० टक्के आहे. तर करंजा बंदरातून होणाऱ्या निर्यातीत ही वाढ झाली आहे.*
>
> **– गणेश नाखवा,**
> *करंजा येथील निर्यातदार*

# मोबाईल खेचणाऱ्याला विरोध केल्याने तरुणावर प्राणघातक हल्ला

**पनवेल : वार्ताहर**

मोबाईल फोन खेचुन पळून जाणाऱ्या लुटारुला विरोध करणे पनवेलच्या तक्का भागात राहणाऱ्या एका तरुणाला चांगलेच महागात पडले आहे. मोबाईल फोन खेचण्यास विरोध करणाऱ्या तरुणावर लुटारुने हॉटेलबाहेरील शेगडीवर असलेला एका मोठया लोखंडी चमच्याने (जाड कौचा) जोरदार हल्ला केल्याचे उघडकीस आले आहे. बा हल्ल्यानंतर लुटारु मोबाईल त्याच ठिकाणी टाकून पळून गेला असून पनवेल शहर पोलिस त्याचा शोध घेत आहेत. या घटनेत मोबाईल धारक तरुण गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

या घटनेत लुटारुच्या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या तरुणाचे नाव दिवेश अजय यादव (२०) असून तो पनवेल मधील तक्का परिसरात राहण्यास आहे. दिवेश हा तरुण तक्का परिसरातील एस.बी.आय. बँक एटीएमजवळून जेवणासाठी पायी चालत जात होता. याच दरम्यान एका अज्ञात इसमाने अचानक पाठीमागून येऊन दिवेशच्या हातातील मोबाईल फोन जबरदस्तीने हिसकावून घेतला आणि पळ काढण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे दिवेशने सदर लुटारुला प्रतिकार करत त्याला पकडण्याचा प्रयत्न केला.

मात्र, सदर लुटारुन कोकण फूड हॉटेलच्या बाहेर मांडलेल्या लोखंडी अँगलच्या शेगडीवरील एक मोठा आणि जड लोखंडी चमचा उचलुन तो दिवेशच्या डोक्यावर मारला. या घटनेत दिवेश गंभीर जखमी झाल्याने लुटारुने त्याचा मोबाईल फोन त्याच ठिकाणी टाकून पळ काढला.

### श्रीमद्रायगिरी प्रतिष्ठानची दहावी बारव संवर्धन मोहीम

**मोहोपाडा :** मोहिमेचा भाग म्हणून खालापूर तालुक्यातील शिरवली गावातील पूर्णपणे मातीखाली गाडलेली ऐतिहासिक बारव शोधून तिचे संवर्धन करण्यात आले.संवर्धन मोहिमेदरम्यान बारवमध्ये एक सुंदर शिलालेख आढळून आला. त्याचे वाचन आणि नोंद करण्यात आली असून या शिलालेखावरून सदर बारव १७०२ साली बांधण्यात आल्याचे समोर आले आहे. तसेच हरिहरेश्वर मंदिरासाठी या बारवची निर्मिती करण्यात आल्याचे समजते. या ऐतिहासिक शोधामुळे प्रतिष्ठानच्या सदस्यांमध्ये मोठा आनंद व्यक्त करण्यात आला.

# आपटा घेरावाडी येथे मोफत आरोग्य शिबिर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उरण मतदार संघातील अतिशय दुर्गम आदीवासी वस्ती ज्या वाडीला १५० वर्षांनंतर आमदार महेश बालदी यांच्या प्रयत्नातून पिण्याचे पाणी आणि लाईट चा प्रश्न सुटलेला आहे,काही दिवसात रस्त्याचा प्रश्न देखील मार्गी लागणार आहे, अशा दुर्गम वाडीवर मोफत आरोग्य शिबीर आणि शेती अवजारे वाटप इंडियन मेडीकल असोशिएशन मुंबई आणि पहल सामाजिक संस्था चेंबूर यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच अर्चना ट्रस्ट मुंबई यांच्या विशेष सहकार्यातून कार्यक्रम पार पडला.

यावेळी वाडीतील आदिवासी ग्रामस्थांची आरोग्य तपासणी करून त्यांना मोफत औषध देण्यात आली, तसेच इंडियन मेडीकल असोशियन मुंबई यांच्या विशेष प्रयत्नाने डॉ. सरिता देवी यांच्या देणगीतून घेरावाडीतील एकुण २९ कुटुंबांना प्रत्येकी एक फावडा, एक घमेला एक टिकाव आणि एक पहार अशी चार शेती अवजारे मोफत वाटप करण्यात आली, बहुतांशी आदिवासी मजुरांकडे शेती अवजारे नसल्यामुळे त्यांना मजूर म्हणून काम करणे अवघड जाते बऱ्याचदा ज्यांच्याकडे शेती अवजारे असतील अशांनाच रोजगार मिळतो त्यामुळे आजपासून घेरावाडीतील सर्व मजुरांना रोजगार करता येईल त्यांचे उत्पन्न देखिल वाढेल असे उदगार डॉ. देसाई यांनी बोलताना व्यक्त केले.

त्याच बरोबर आदिवासी विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या सर्व योजनांची माहीती महाराष्ट शासनाच्या प्रकल्प कार्यालयातील निरीक्षक कैलास चव्हाण यांनी दिली तसेच पनवेल पंचायात समितीचे सदस्य मयूर शेलार यांनी मान्यवरांचे व सर्व डॉक्टरांचे मनापासून आभार मानले. यावेळी खालापूर पंचायत समितीच्या सदस्या प्रमिला पाटील, डॉ. शाहनबाग, डॉ. देसाई डॉ. हळदेवणकर डॉ. सौ. हलदेवणकर, डॉ. प्रभू सर पहलसंस्थेचे समन्वयक मधुकर पुजारी, सामाजीक कार्यकर्ते रत्नाकर घरत, ग्रा. पं. सदस्य दामा' माडे, प्रकल्प कार्यालयातील निरीक्षक शिरीष लाड, रोहन फाटक आणि मोठ्या संख्येने आदिवासी ग्रामस्थ उपस्थित होते.

# लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल आणि ज्यु.कॉलेज कामोठेचे क्रीडा क्षेत्रात सुयश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज कामोठे या विद्यालयातील विद्यार्थी चैतन्य प्रकाश रेवाळे याने आर्टिस्टिक्स जिमनॅस्टिक या सांघिक क्रीडा स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला. १४ वर्ष वयोगटातील सदर स्पर्धा तालुका क्रीडा संकुल कामठी, जि. नागपूर येथे पार पडली होती.



क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय नागपूरद्वारा आयोजित राज्यस्तरीय शालेय जिम्नॅस्टिक क्रीडा स्पर्धा २०२५-२६मध्ये या विद्यार्थ्याने उत्तुंग यश मिळवले आहे.

याबद्दल रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल मेंबर, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या विद्यार्थ्याचे विशेष अभिनंदन केले. विद्यालयाचे नाव अशाच पद्धतीने नेहमी उंचावत राहावे आणि क्रीडा क्षेत्रात आपले स्वतःचे नाव उज्वल करावे, असे त्यांनी प्रतिपादन केले तसेच त्याच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

विद्यालयाचे चेअरमन आमदार प्रशांत ठाकूर यांनीही या विद्यार्थ्याचे अभिनंदन केले. लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज कामोठे विद्यालयाच्या प्राचार्या स्वप्नाली म्हात्रे नेहमीच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तत्पर असतात. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनीही या विद्यार्थ्याचे अभिनंदन केले.

# चंद्रकांत मढवी यांना रयत बँकेतर्फे चांदीचे नाणे प्रदान

**गव्हाण : रामप्रहर वत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजचे कनिष्ठ लेखनिक चंद्रकांत मढवी यांच्या सेवानिवृत्ती निमित्त रयत शिक्षण संस्थेतील सेवकांची अर्थवाहिनी असलेल्या रयत को-ऑपरेटिव्ह बँकेच्या वतीने नवी मुंबई येथील वाशी शाखेमध्ये त्यांना चांदीचे नाणे प्रदान करून सत्कार करण्यात आला.



याप्रसंगी बँकेचे सी.ई.ओ.कणसे साहेब,जनरल मॅनेजर काकडे साहेब,असिस्टंट जनरल मॅनेजर देसाई साहेब, चेअरमन पाटील साहेब, ब्रँच मॅनेजर माने साहेब, बँक अधिकारी मिर्गे साहेब, प्रेरणा म्हात्रे व इतर कर्मचारी उपस्थित होते.

चंद्रकांत मढवी हे रयत शिक्षण संस्थेमधील प्रदीर्घ सेवेतून ३१ मे २०२६ रोजी सेवानिवृत्त होत आहेत. संस्थेतील सेवानिवृत्त सभासद चांदीचे नाणे भेट देतात.

## "एक कृतार्थ संध्याकाळ"









संपादकीय

# विकासाचे 'पॉवर हाऊस'

नव्या संकल्पना, तरुणाईच्या प्रतिभेला नव्या संधी आणि विकासाच्या स्पर्शाने उंचावणारे राहणीमान हे महाराष्ट्राचे भविष्य असेल, तर त्याची पायाभरणी आता सुरू झाली आहे असे मानावयास हरकत नाही.

**कोणत्याही संकटास हिकमतीने सामोरे न जाता केवळ हातावर हात घेऊन स्वस्थ बसले तर संकटे नेहमीच हतबलांचा घात करतात. म्हणून, संकटे हे आव्हान मानून त्यामध्ये लपलेल्या संधी शोधल्या, तर संकटे सरल्यानंतर त्या संधींचे सोने करता येते हे भारताने गेल्या दशकात अनेकदा दाखवून दिले आहे. सध्या युद्धस्थितीमुळे जगात सगळीकडेच इंधनाच्या उपलब्धतेची अनियमितता आणि साठेबाजीसारख्या प्रकारांमुळे काहीशी संकटसदृश परिस्थिती निर्माण झालेली आहे. देश झपाट्याने प्रगतीच्या दिशेने झेपावत असताना अचानक आणि अनपेक्षितपणे उद्भवलेल्या या ऊर्जासंकटाच्या काळात जर स्वस्थ बसून राहिले, तर संकटांना संधी मिळाली असती. म्हणूनच, संकटांपासून ती संधी हिरावून घेऊन ऊर्जासंकटाच्या काळात नवी ऊर्जाकेंद्रे निर्माण करण्याच्या केंद्र सरकारच्या प्रयत्नात महाराष्ट्र सरकारने दिलेली साथ महत्वाची ठरते. मंगळवारी महाराष्ट्र सरकारच्या उद्योग विभागाच्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत झालेल्या काही निर्णयांनी हे सिद्ध केले आहे, की देशाच्या प्रगतीच्या वाटचालीस ऊर्जा देणारे महत्वाचे 'पॉवर हाऊस' म्हणून महाराष्ट्राची भूमिका महत्वाची ठरणार आहे. औद्योगिक गुंतवणूक, रोजगार निर्मिती आणि आधुनिक औद्योगिक परिसंस्था विकसित करून देशाच्या औद्योगिक विकासात महत्वाचा वाटा उचलणाऱ्या महाराष्ट्रात उभे राहणारे सुमारे ९० हजार कोटी रुपये गुंतवणुकीचे अतिविशाल आणि विशाल औद्योगिक प्रकल्प भविष्यातील कोणत्याही समस्येस तोंड देण्याचा आत्मविश्वास रुजविण्यासाठी महत्वाचे ठरणार असल्याने त्याचे स्वागत करावयास हवे. या प्रकल्पांमुळे राज्यात रोजगाराच्या सुमारे २० हजार संधी निर्माण होणार असून मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्रातील औद्योगिक विकासाला चालना मिळणार असल्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा दावा आहे. महाराष्ट्राच्या निर्मितीपासून पुढील अनेक दशके विकासाचे वारे काही मर्यादित महानगरांभोवती घुटमळत होते. त्यामुळे राज्याचा मोठा भाग विकासपासून वंचित राहिला आणि रोजगार, औद्योगिक गुंतवणूक, पायाभूत सुविधांचाही निर्मिती या सर्व बाबींचाही मोठा अनुशेष महाराष्ट्राच्या शिरावर ओझे होऊन राहिला. आता विकासाचे वारे राज्यात सर्वत्र संचार करू लागतील, आणि या विकासातूनच आत्मनिर्भर भारताच्या आत्मविश्वासाचा एक नवा संदेशही जगाला दिला जाईल. महाराष्ट्राच्या अहिल्यानगर जिल्ह्यातील शिर्डी तीर्थक्षेत्र आता वेगवेगळ्या प्रकारच्या तोफगोळ्यांचा उत्पादनाचे केंद्र म्हणून भारताच्या नकाशावर आपली नवी ओळख बनवत आहे. शिर्डीमध्ये सरकार आणि खासगी क्षेत्राच्या संयुक्त सहभागातून उभारला जाणारा "डिफेन्स हब" हा भारताच्या संरक्षण उत्पादन क्षेत्रातील प्रकल्प भविष्यात भारताला जागतिक संरक्षण उत्पादन नकाशावर मजबूत स्थान मिळवून देईल, तेव्हा सहाजिकच महाराष्ट्राची मानदेखील अभिमानाने उंचावणार आहे. हा प्रकल्प भारताच्या संरक्षण निर्यात क्षमतेलाही बळ देईल, आणि महाराष्ट्रात औद्योगिक विकासाचा नवा पट्टा तयार होईल. गेल्या अनेक दशकांपासून, संरक्षण साहित्य आयात करणारा देश अशी भारताची ओळख निर्माण झाली. आता भारत संरक्षण साहित्य निर्यात करणाऱ्या राष्ट्रांत स्वतःचे स्थान निर्माण करतो व साईबाबांच्या पाऊलखुणांनी पावन झालेल्या शिर्डीने त्यावर मोहोर उमटवली. इराण युद्धामुळे सध्या जगभरातील पुरवठा साखळी विस्कळीत झाली आहे. अशा स्थितीतून बाहेर पडल्यानंतर जेव्हा भारतातून संरक्षण सामग्रीची निर्यात सुरू होईल, तेव्हा संकटातून साधलेल्या संधींचे भारताने सोने केल्याची खात्री जगाला पटेल.**

# तंबाखूला नकार, निरोगी जीवनाचा स्वीकार

आजच्या आधुनिक युगात विज्ञान आणि वैद्यकीय क्षेत्र झपाट्याने प्रगती करत असताना दुसऱ्या बाजूला तंबाखूचे वाढते व्यसन समाजासमोर गंभीर आरोग्य संकट निर्माण करत आहे. गुटखा, पानमसाला, खर्रा, सिगारेट, बीडी तसेच इतर तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन युवकांपासून प्रौढांपर्यंत चिंताजनक गतीने वाढताना दिसत आहे. या वाढत्या धोक्याच्या पार्श्वभूमीवर दरवर्षी ३१ मे हा दिवस 'जागतिक तंबाखू विरोधी दिन' म्हणून साजरा केला जातो. यावर्षी 'खोट्या आकर्षणाचा पर्दाफाश निकोटीन आणि तंबाखूच्या व्यसनाला चोख प्रत्युत्तर' या मध्यवर्ती संकल्पनेवर आधारित केवळ जनजागृती न करता, समाजामध्ये तंबाखूविरोधी एक व्यापक जनआंदोलन उभे करण्याचा निर्धार करण्यात आला आहे. तंबाखू हे केवळ क्षणिक आनंदाचे व्यसन नसून ते तोंडाचा, घशाचा व फुफ्फुसांचा कर्करोग, हृदयरोग आणि स्ट्रोक यांसारख्या अनेक जीवघेण्या आजारांचे मूळ कारण ठरत आहे.



या गंभीर आव्हानाचा सामना करण्यासाठी कोल्हापूर जिल्ह्यात राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत गेल्या वर्षभरात जनजागृती, समुपदेशन, व्यसनमुक्ती सेवा आणि कायद्याची अंमलबजावणी या चहुबाजूने प्रभावी कामगिरी करण्यात आली आहे. जिल्ह्यातील १७ तंबाखूमुक्ती समुपदेशन केंद्रातून एप्रिल २०२५ ते मार्च २०२६ या कालावधीत ५,७६३ रुग्णांची नोंदणी करण्यात आली, ज्यापैकी ९८४ नागरिकांनी तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन पूर्णपणे सोडण्यात यश मिळवले आहे. ही आकडेवारी व्यसनमुक्तीच्या दिशेने पडणारे एक आशादायक पाऊल मानली जात असली, तरी दुसरीकडे राबविण्यात आलेल्या तपासणी मोहिमेत ७१३ संशयित रुग्णांपैकी ४२ जणांमध्ये कर्करोगाचे झालेले निदान समाजासाठी एक गंभीर धोक्याची घंटा वाजवणारे ठरले आहे.

तरुणाईला या जीवघेण्या विळख्यातून सुरक्षित ठेवण्यासाठी शैक्षणिक आणि आरोग्य संस्थांमध्ये विशेष उपक्रम राबवून जिल्ह्यात ११७ तंबाखूमुक्त शाळा आणि ५३६ तंबाखूमुक्त आरोग्य संस्थांची निर्मिती करण्यात आली आहे. शाळा परिसरात तंबाखू विक्रीला प्रतिबंध करण्यासोबतच विविध व्याख्याने, सामूहिक शपथ आणि पोस्टर मोहिमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक बदल घडत आहेत. केवळ प्रबोधनावर न थांबता, कोटपा (COTPA २००३) कायद्यांतर्गत पोलीस, आरोग्य आणि अन्न व औषध प्रशासन विभागाने संयुक्तपणे मोठी मोहीम उघडली आहे. सार्वजनिक ठिकाणी धुम्रपान करणाऱ्या व कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या ५६१ लोकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून, यामध्ये आरोग्य विभागाने ४,६७,००० रुपये, पोलीस विभागाने १,९२,००० रुपये आणि अन्न व औषध प्रशासनाने ३४,००० रुपयांची दंडवसुली करत कायद्याचा कडक बडगा उगारला आहे.

धूम्रपान करणाऱ्या व्यक्तीमुळे त्याच्या आसपास वावरणाऱ्या लहान मुलांच्या, महिलांच्या आणि वृद्धांच्या आरोग्याला निर्माण होणारा 'पॅसिव्ह स्मोकिंग'चा धोका लक्षात घेता हा लढा आता केवळ प्रशासकीय न राहता समाजाची सामूहिक जबाबदारी बनला आहे. पालक, शिक्षक, ग्रामपंचायती आणि सामाजिक संस्थांनी एकत्र येऊन तरुणांना योग्य दिशा देणे ही काळाची गरज आहे. तंबाखूचे व्यसन सोडण्यासाठी १८००-११-२३५६ हा मोफत समुपदेशन टोल फ्री क्रमांक उपलब्ध करून देण्यात आला असून नागरिकांनी याचा लाभ घेणे आवश्यक आहे. 'तंबाखूला नकार आणि निरोगी जीवनाचा स्वीकार' करत सशक्त राष्ट्र उभारणीसाठी प्रत्येक कोल्हापूरकराने या व्यसनमुक्तीच्या चळवळीत सक्रिय सहभाग नोंदवणे हेच या जागतिक तंबाखू विरोधी दिनाचे खरे उद्दिष्ट ठरेल. जिल्ह्यात जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली तंबाखू विरोधी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत असून उल्लंघन करणाऱ्यांविरोधात आरोग्य, पोलीस व अन्न-औषध प्रशासन विभागामार्फत संयुक्त मोहिमा राबविण्यात येत आहेत.

**-राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कक्ष, कोल्हापूर**

# स्मिता पाटील : अर्धवट राहिलेली कविता

१३ डिसेंबर १९८६. 'वारिस'च्या सेटवर शेवटचा शॉट देऊन घरी परतलेली स्मिता पाटील दुसऱ्या दिवशी कधीच न जागी होणारी झोपली. वय अवघं ३१. प्रसूतीनंतरच्या गुंतागुंतीने एका तेजस्वी ताऱ्याचा असा अकाली अस्त झाला. पण स्मिता पाटील आजही 'अर्धवट राहिलेली कविता' म्हणून रसिकांच्या मनात जिवंत आहे. १७ ऑक्टोबर १९५५ रोजी पुण्यात शिवाजीराव पाटील आणि सामाजिक कार्यकर्त्या विद्याताई पाटील यांच्या घरी स्मिताचा जन्म झाला. वडील मंत्री होते, आई स्त्री चळवळीतील अग्रणी. घरातच सामाजिक भान आणि कलेचे संस्कार झाले. फर्ग्युसन महाविद्यालयात शिकत असतानाच सत्यदेव दुबे यांच्या नाट्य कार्यशाळेत ती सहभागी झाली आणि तिथेच तिच्यातली अभिनेत्री घडली. श्याम बेनेगल यांनी तिला टीव्हीवर न्यूज रीडर म्हणून पाहिलं आणि 'चरणदास चोर'साठी पहिली संधी दिली. १९७४ चा 'मंथन' तिचा पहिला हिंदी चित्रपट. पण खरी ओळख दिली ती 'निशांत'ने.

गावातील अत्याचाराविरुद्ध उभी राहणारी सुशीला म्हणून स्मिताने प्रेक्षकांच्या काळजाला हात घातला.समांतर सिनेमाची राणी ऐंशीचं दशक म्हणजे हिंदी सिनेमात 'समांतर' आणि 'मुख्य प्रवाह' यांच्यातील लढाई. स्मिता पाटील समांतर सिनेमाचा चेहरा झाली. 'भूमिका', 'मंथन', 'आक्रोश', 'चक्र', 'बाजार', 'मंडी' प्रत्येक भूमिकेत ती फक्त अभिनय करत नव्हती, तर त्या स्त्रीचं जगणंच जगत होती. 'भूमिका'तील उर्वशी दळवी, 'बाजार'मधील नाजनीन, 'मिर्च मसाला'तील सोनबाई या



सगळ्या भूमिका बंडखोर होत्या. पुरुषप्रधान समाजाला प्रश्न विचारणाऱ्या होत्या. शबाना आझमीसोबत तिची व्यावसायिक स्पर्धा चर्चेत असली तरी दोघींनी मिळून 'अर्थ'सारखा मैलाचा दगड उभा केला. सौंदर्यापलीकडची स्मिता स्मिता दिसायला पारंपरिक नायिका नव्हती. सावळा रंग, मोठे डोळे, नाकात नथ. पण कॅमेऱ्यासमोर उभी राहिली की तिचं व्यक्तिमत्त्वच संवाद साधायचं. "मी गोरी नाही, उंच नाही, पण माझ्यात काहीतरी आहे की लोक मला पाहतात" असं ती म्हणायची. फोटोग्राफर पाब्लो बार्थोलोम्यूसोबतच्या तिच्या ब्लॅक अँड व्हाईट पोर्ट्रेट्स आजही जागतिक दर्जाची मानली जातात. स्मिताने सौंदर्याच्या व्याख्याच बदलून टाकल्या.

स्मिताचं वैयक्तिक आयुष्य तिच्या भूमिकांइतकंच चर्चेत राहिलं. अभिनेते राज बब्बर यांच्याशी तिचं प्रेम जुळलं. राज आधीच विवाहित होते. समाजाने, मीडियाने तिला 'घर फोडणारी' ठरवलं. पण स्मिताने कधीच स्पष्टीकरण दिलं नाही. २८ नोव्हेंबर १९८६ रोजी तिने मुलगा प्रतीकला जन्म दिला. आणि अवघ्या १७ दिवसांत १३ डिसेंबरला ती जग सोडून गेली. "ती आई होण्यासाठी खूप उत्सुक होती, पण नियतीला ते मान्य नव्हतं" असं श्याम बेनेगल म्हणाले होते. स्मिताने १० वर्षांत ८० पेक्षा जास्त चित्रपट केले. दोन राष्ट्रीय पुरस्कार, एक फिल्मफेअर आणि महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळवला. १९८५ मध्ये कान चित्रपट महोत्सवाच्या ज्युरीमध्ये निवड होणारी ती पहिली भारतीय अभिनेत्री. 'वारिस', 'गलियों का बादशाह', 'डान्स डान्स' असे काही व्यापारी चित्रपटही तिने केले, कारण "समांतर सिनेमा जगवायचा असेल तर मुख्य प्रवाहातही टिकावं लागतं" हे तिचं ठाम मत होतं.आज तिचा मुलगा प्रतीक बब्बर अभिनेता आहे. स्मिताच्या नावाने 'स्मिता पाटील डॉक्युमेंटरी अँड शॉर्ट फिल्म फेस्टिव्हल' भरतो. (साभार इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान

## व्हॉट्सॲप आणतंय नवे फीचर; प्रायव्हसी होणार भक्कम

जगातील सर्वात लोकप्रिय इन्स्टंट मेसेजिंग ॲप व्हॉट्सॲप आपल्या युझर्सच्या प्रायव्हसीसाठी एक अत्यंत मोठा बदल करण्याच्या तयारीत आहे. आतापर्यंत व्हॉट्सॲपवर संवाद साधायचा असेल, तर समोरील व्यक्तीकडे तुमचा मोबाईल नंबर असणे अनिवार्य असायचे, मात्र आता हे चित्र बदलणार आहे. व्हॉट्सॲप एका खास 'युझरनेम फीचर'वर काम करत असून याच्या मदतीने युझर्स आपला फोन नंबर शेअर न करताही एकमेकांशी चॅट करू शकणार आहेत. सध्या हे फीचर काही बीटा टेस्टर्ससाठी उपलब्ध करून देण्यात आले असून लवकरच ते सर्वसामान्य युझर्ससाठी रोलआउट केले जाईल.

टेलिग्रामप्रमाणे मिळणार सुरक्षा

अनेक सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्स किंवा 'टेलिग्राम' ॲपवर युझरनेम फीचर बऱ्याच काळापासून उपलब्ध आहे. टेलिग्रामवर युझर्स आपला फोन नंबर हाईड करून अनोळखी लोकांशी संवाद साधू शकतात. आता अगदी तशीच सुरक्षा व्हॉट्सॲपवरही पाहायला मिळणार आहे.

नवीन अपडेटनुसार प्रत्येक युझरला इन्स्टाग्राम किंवा एक्स प्रमाणे स्वतःचे एक युनिक युझरनेम तयार करता येईल. त्यामुळे कोणत्याही नवीन व्यक्तीशी, बिझनेस अकाउंटशी किंवा ऑनलाईन ग्रुपमध्ये जोडले जाताना तुम्हाला तुमचा वैयक्तिक मोबाईल नंबर देण्याची गरज उरणार नाही.

महिला आणि सायबर सुरक्षेसाठी गेमचेंजर!

आजच्या काळात अनेकांना आपला वैयक्तिक नंबर प्रत्येकासोबत शेअर करायला आवडत नाही, विशेषतः महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने ही मोठी चिंता असते. कोणत्याही अनोळखी ग्रुपमध्ये नंबर गेल्यास सायबर फ्रॉड किंवा हॅकिंगचा धोका वाढतो. व्हॉट्सॲपच्या या नवीन फीचरमुळे युझर्सची खरी ओळख सुरक्षित राहील आणि चॅटिंग दरम्यान समोरील व्यक्तीला फक्त तुमचे युझरनेम दिसेल, नंबर नाही.

फसवणूक रोखण्यासाठी असणार कडक नियम

अहवालानुसार या फीचरचा गैरवापर रोखण्यासाठी व्हॉट्सॲप काही कडक नियम लागू करू शकते. प्रत्येक युझरचे नाव वेगळे असेल. फेक अकाउंट्स आणि फसवणूक रोखण्यासाठी काही विशिष्ट शब्दांवर किंवा फॉरमॅटवर बंदी घातली जाऊ शकते. जर एखाद्या युझरने आपले युझरनेम बदलले, तर त्याची माहिती समोरील चॅट बॉक्समध्ये दिसू शकते, जेणेकरून फसवणूक होणार नाही.

# स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर

विनायक दामोदर सावरकर अर्थात वीर सावरकर यांचा आज जन्मदिन. विनायक दामोदर सावरकर हे खऱ्या अर्थाने बहुआयामी व्यक्तीमत्व होते. स्वातंत्र्यसैनिक, राजकारणी, समाजसुधारक, कवी व लेखक, हिंदू तत्त्वज्ञ ते भाषाशुद्धी व लिपिशुद्धी चळवळींचे प्रणेते अशा प्रत्येक क्षेत्रात सावरकरांचे योगदान अनन्यसाधारण आहे.

सावरकरांचा जन्म २८ मे १८८३ रोजी नाशिक जिल्ह्यातील भगूर या गावी झाला. दामोदर सावरकर यांना तीन अपत्य होती. बाबाराव सावरकर हे थोरले, विनायक सावरकर हे मधले तर नारायणराव सावरकर हे धाकटे होते. सावरकरांचे प्राथमिक शिक्षण नाशिकच्या शिवाजी विद्यालयामध्ये झाले. ते लहानपणापासूनच अत्यंत बुद्धिमान होते. वक्तृत्व, काव्यरचना याच्यावर त्यांचे प्रभुत्व होते. जिव्हा आणि लेखणी ते सारख्याच ताकदीने चालवत. त्यांनी वयाच्या तेराव्या वर्षी लिहिलेला स्वदेशीचा फटका, स्वतंत्रतेचे स्तोत्र या रचना त्यांच्या प्रतिभेची साक्ष देतात.

राष्ट्रभक्तसमूह ही गुप्त संघटना सावरकरांनी पागे आणि म्हसकर या आपल्या साथीदारांच्या साहाय्याने स्थापन केली. मित्रमेळा ही संघटना या गुप्त संघटनेची प्रकट शाखा होती. पुढे संस्थेचा विस्तार वाढत गेला आणि तिचे रुपांतर अभिनव भारत



निमित्त

संघटनेमध्ये झाले. सावरकरांनी पुण्यामध्ये इ.स. १९०५ साली विदेशी कापडांची होळी केली. त्यानंतर श्यामजी कृष्ण वर्मा यांनी ठेवलेली शिवाजी शिष्यवृत्ती मिळवून कायद्याच्या अभ्यासासाठी सावरकर लंडनला रवाना झाले. देशाच्या स्वातंत्र्याचा ध्यास घेतलेल्या सावरकरांनी तेथे देखील आपले कार्य सुरूच ठेवले. लंडनमधील इंडिया-हाऊसमध्ये राहात असताना सावरकरांनी जोसेफ मॅझिनीच्या आत्मचरित्राचे मराठी भाषांतर केले. या भाषांतराला जोडलेल्या प्रस्तावनेत सावकरांनी सशस्त्र क्रांतीचे तत्त्वज्ञान विषद केले होते. त्या काळातील अनेक युवकांना ही प्रस्तावना म्हणजे स्वातंत्र्याचा बीजमंत्र वाटत असे. त्याच काळात त्यांनी इतर देशांमधील क्रांतिकारक गटांशी संपर्क साधून, बॉम्ब तयार करण्याचे तंत्रज्ञान आत्मसात केले. ते तंत्रज्ञान व २२ ब्राऊनिंग पिस्तुले त्यांनी भारतात पाठवली. त्यापैकीच एका पिस्तुलाने नाशिकचा कलेक्टर जॅक्सन याचा वध अनंत कान्हेरे या तरुणाने केला.

यानंतर सावरकरांना अटक करण्यात आली. अटक झाल्यानंतर त्यांची अंदमानाच्या काळकोठडीत रवानगी करण्यात आली. अंदमानातून सुटल्यानंतर सावरकरांना ब्रिटिशांनी रत्नागिरीत स्थानबद्ध केले. त्यानंतर हिंदू समाज एकजीव आणि संघटित करण्यासाठी सावरकरांनी रत्नागिरीत राहून कार्य केले. हिंदू समाजाच्या अधःपतनाला जातिव्यवस्था, चातुर्वर्ण्य व्यवस्था जबाबदार आहे. हे ओळखून त्यांनी जातिव्यवस्थेचा विरोध केला. आपल्या लेखनाने कोणी सनातनी दुखावेल याची चिंता न करता अंधश्रद्धा, जातिभेद यांवर त्यांनी कडाडून टीका केली. त्यांनी रत्नागिरीमधील आपल्या वास्तव्यामध्ये समाजसुधारणेसाठी अनेक कार्य केली. त्यांनी जावळपास ५०० मंदिरे अस्पृश्यांसाठी खुली केली.

अशा या थोर क्रांतिकाराचा, साहित्यित्यिकाचा, हिंदू संघटकाचा मृत्यू २६ फेब्रुवारी १९६६ रोजी मुंबईत झाला.

(साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

## रोज पोटभर जेवता तरी आजारी पडता? हे लक्षात ठेवा...

आयुर्वेदात प्रत्येक पदार्थाच्या सेवनाचे नियम सांगण्यात आले आहेत. खाण्यापिण्यापासून ते पाणी पिण्यापर्यंत बऱ्याच गोष्टींची काळजी घ्यावी लागते. तेव्हाच आजार दूर होण्यास मदत होते. खाण्यापिण्यासंबंधीत ५ नियमांचे पालन केले तर काही समस्या दूर होण्यास मदत होतील आणि शरीर निरोगी राहील तसंच पचनक्रिया मजबूत राहण्यासही मदत होईल काही गोष्टींची काळजी घेतल्यास तुम्हाला उद्भवणारे शारीरिक त्रास आपोआप कमी होतील आणि निरोगी राहाल.



१) अशी चपाती खा :

सगळ्यात पहिला नियम असा की तुम्ही जी चपाती खात आहात ती कोणत्या पिठापासून तयार केली आहे ते लक्षात घ्या. फक्त गव्हाची चपाती खाऊ नका. १० किलो पिठात १ किलो सोयाबीन, १ किलो जवस आणि १ किलो बेसन घाला ज्यामुळे चपातीतील पोषक तत्व अधिक वाढतील आणि चपाती पौष्टीक होईल.

२) पिठात पालेभाज्या मिसळा :

दुसरा नियम असा की जेव्हा तुम्ही चपाती करत असाल तेव्हा पिठात पालेभाज्यांची काही पानं मिसळा. पालक, मेथी, शेवग्याच्या पानांचा वापर करा. जितकं पीठ मळत असाल तर त्याच्या २५ टक्के पानं बारीक चिरा आणि मग चपाती करा. तुम्ही या पद्धतीनं पराठासुद्धा करू शकता.

३) खाल्ल्यानंतर पाणी प्या :

तिसरा नियम असा की काहीही खाल्ल्यानंतर पाणी प्यायला विसरू नका. जेवल्यानंतर ३० ते ४० मिनिटं थांबून नंतर पाणी प्या. तुम्ही जेवणाच्या मध्ये पाणी पिऊ शकता. जेवल्यानंतर त्वरीत पाणी प्यायल्यानं अग्नि कमी होतो आणि खाल्लेलं अन्न पचायला वेळ लागतो.

४) भूक लागल्यानंतरच खा :

चौथा नियम असा की भूक लागल्यानंतरच खा. भूक लागली नसेल तर खाऊ नका. तुम्हाला तहान लागली नसेल तर पाणी पिऊ नका. याव्यतिरिकित कोल्ड ड्रिंक किंवा चहा, कॉफीसुद्धा पिऊ नका. कारण भूक लागलेली नसताना खाणं तुम्हाला ओव्हरवेट बनवू शकतं.

५) सूर्यास्तानंतर खाऊ नका :

पाचवा आणि सगळ्यात महत्वाचा नियम म्हणजे सूर्यास्तानंतर खाऊ नका. आठवड्यातून एकदा उपवास करा. सहा दिवस खा आणि एक दिवस उपवास करा. यामुळे सर्व आजार आपोआप दूर होतील.

# पोलादपूर शहरातील वाढती वाहतूक कोंडी, अपघाताच्या धोक्यावर सतर्कतेसाठी भाजपचे निवेदन



**पोलादपूर : प्रतिनिधी**

शहरातील वाढत्या वाहतूक कोंडी व अपघाताच्या धोक्यावर सतर्कतेसाठी भारतीय जनता पार्टीचे पोलादपूर शहराध्यक्ष महेश निकम यांच्या नेतृत्वाखाली पोलादपूर पोलीस ठाण्यामध्ये सहाय्यक पोलीस निरीक्षक आनंद रावडे यांना निवेदन देण्यात आले.

या निवेदनामध्ये रोज मुंबईकडे प्रवासी वाहतूक करणाऱ्या गाडया पोलादपूर शहरातील सर्व्हिस रोडवर थांबून प्रवासी घेत असल्यामुळे वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होत आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी मुंबईकडे जाणाऱ्या सर्व्हिस रोडवरील चायनीज दुकानासमोर होणारी वाहनांची पार्किंग, प्रवासी वाहतूक करणारी वाहने व त्यामुळे निर्माण होणारी वाहतूक कोंडी, यामुळे नागरिकांना मोठया समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचा आरोप भाजपा शहराध्यक्ष महेश निकम यांनी केला. तसेच चुकीच्या पार्किंगमुळे विद्यार्थी, रुग्णवाहिका व इतर वाहनचालकांनाही त्रास सहन करावा लागत असल्याचे नमूद करण्यात आले. समस्येकडे पोलीस प्रशासनाने तातडीने लक्ष देत संबंधित वाहनांवर कठोर कारवाई करावी, वाहतूक सुरळीत राहण्यासाठी विशेष नियोजन करावे, अशी ठाम मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

यावेळी महिला जिल्हा उपाध्यक्षा तनुजा भागवत, अल्पसंख्याक शहराध्यक्ष मुश्ताक मुजावर, भाजप पोलादपूर शहर सरचिटणीस मनोज पवार तसेच प्रतीक सुर्वे उपस्थित होते. या निवेदनाची सहाय्यक पोलीस निरीक्षक आनंद रावडे यांनी समस्येची गांभिर्याने दखल घेत संबंधित वाहनांवर कारवाई करून योग्य त्या उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले.

## कारची स्कूटरला ठोकर; वॉर्डबॉय झाला गंभीर जखमी

**पोलादपूर : प्रतिनिधी**

मुंबई गोवा महामार्गावरील ग्रामीण रुग्णालयासमोर स्कूटरस्वार वार्डबॉय तरुणास कारची पाठीमागून ठोकर लागून वार्डबॉय गंभीर जखमी झाला. किरण गौतम बाविस्कर (वय 22 वर्षे) हा वार्डबॉय एक्टिवा (क्र. एमएच 08 बीजे9724) घेऊन महामार्गावरून पोलादपूर दिशेने कामानिमित्त जात असताना त्याचदरम्यान पाठीमागून मुंबई बाजूकडून महाबळेश्वरकडे जाणारी महिंद्रा मरांझो कार (क्र. जीजे 29टी 7076) चालक हर्ष दिनेशकुमार पटेल वय 21 यांनी अतिवेगाने कार चालून रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून समोरच्या स्कूटरला पाठीमागून ठोकर मारून अपघात केला. या अपघातात स्कूटरस्वार वार्डबॉयच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्याच्यावर पोलादपूर ग्रामीण रुग्णालयात उपचार करून अधिक उपचारासाठी महाड येथे पाठवण्यात आले आहे.

माहिती समजताच पोलादपूर पोलीस व कशेडी महामार्ग पोलीस मदत केंद्राचे पोलीस उपनिरीक्षक रामेश्वर ढाकणे, हवालदार राजन माजलकर, कृष्णा चौधरी आदींनी घटनास्थळी धाव घेऊन अपघाताचा पंचनामा केला आहे.



## मंत्री भरत गोगावले यांच्या वाढदिवसानिमित्त शेतकऱ्यांना केले बियाणांचे वाटप



**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील शेतकरी वर्गासाठी विकासशेठ मित्र मंडळ, सिध्देश शेठ युवा मंच तसेच युवासेना पोलादपूर यांच्या वतीने मंत्री भरतशेठ गोगावले यांच्या येत्या वाढदिवसानिमित्त यंदाही बियाणे वाटप करण्यात आले. या उपक्रमाला गेल्या दोन वर्षांपासून शेतकरी वर्गातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक लक्ष्मण मोरे यांनी यावेळी उपस्थित शेतकरी बांधवांना मार्गदर्शन करताना नैसर्गिक शेतीसोबतच आधुनिक व अभियांत्रिकी आधारित प्रगत शेतीकडे शेतकऱ्यांनी वळावे, यासाठी मंत्री भरतशेठ गोगावले यांच्या माध्यमातून शेतकरी वर्गाला आवश्यक ती मदत उपलब्ध करून दिली जाईल, असे आश्वासन यावेळी दिले आहे. याप्रसंगी सुमारे 500 हून अधिक शेतकरी बांधवांना विविध प्रकारच्या बियाणांचे वाटप करण्यात आले.

याप्रसंगी पं.स.सभापती अविनाश शिंदे, उपसभापती अनिता अनिल भिलारे, पं.स. सदस्य अनिल दळवी, तालुका प्रमुख निलेश अहिरे, उपतालुका प्रमुख संजय मोदी, विभागप्रमुख सतीश शिंदे, कृष्णा नरे, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक लक्ष्मण मोरे, म्हाळुंगे सरपंच विकास नलावडे, शहर प्रमुख सुरेश पवार, नगरसेवक विनायक दीक्षित, संदीप कदम, भरत चोरगे, उपकृषी अधिकारी रवींद्र कुंटे तसेच युवासेना, शिवसेना व महिला आघाडीचे पदाधिकारी आणि मोठया संख्येने शेतकरी उपस्थित होते.

यावेळी कृषी अधिकारी रवींद्र कुंटे यांनी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना शासनाच्या विविध कृषी योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, माझ्या अशीलांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत श्री. अंकुश रामा गोंधळी, श्री. तुकाराम रामा गोंधळी, श्री. लहू रामा गोंधळी, श्रीमती. द्रोपदी रामा गोंधळी उर्फ द्रोपदी उमाजी राजे, श्री. प्रसाद भरत म्हात्रे, सौ. शंकाली प्रशांत म्हात्रे, सौ. प्रतीक्षा शरद पाटील, सौ. प्रगती निवृत्ती फडके, यांच्या नावे अधिकार अभिलेखी नमूद असलेल्या भोगवटाधारकाकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. जिचे सविस्तर वर्णन खालील परिशिष्टामध्ये केलेले असून, यापुढे या जमिनीस संक्षिप्तपणे 'सदरहू मिळकत' असे उल्लेखलीले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे–नितळस, ता– पनवेल, जिल्हा– रायगड**

| गट क्रमांक | हिस्सा क्रमांक | क्षेत्र हे.आर. पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ८० | ० | १–१५–१० पो.ख. ०–००–०० एकूण १–१५–१० पैकी भोगवटाधार यांच्या मालकीहक्काचे ०–७६–१० इतके क्षेत्र | ११.८७ |

तरी वरील सदरहू मिळकतीबाबत, अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध व अधिकार, ताबाकब्जा, कुळवहिवाट, इजमेंट, समझोता करार, साठेकरार, विक्री, विनिमय, गहाण, बोजा, दान, पोटगी, वारसाहक्क, ट्रस्ट, न्यास, भाडेपट्टा, सबलीज, अंडरलीज, लियन वगैरे असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत, खाली सही करणार, खरेदीदारांचे वकील यांच्या खालील पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह, लेखी हरकती रजिस्टड पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे, मुदतीत हरकती प्राप्त न झाल्यास, सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे, असे समजून आमचे अशील सदर मिळकती संदर्भातील सर्व व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती, आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

**दिनांक : २८/०५/२०२६**

**सही /–**
**ॲड. सदिच्छा दिलीप अस्वले,**
**२०३, मोहिनील अपार्टमेंट, नवे पोपुड,**
**म्हातवली, उरण, रायगड पिन कोड– ४००७०२**
**मोबाईल नं. ७६६६०१०२९३**



वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी राम प्रहर



Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's

**RAMSHETH THAKUR COLLEGE OF COMMERCE & SCIENCE**

**Plot no.1, Sector- 33, Kharghar , Navi Mumbai – 410210**

**APPLICATIONS ARE INVITED FOR THE FOLLOWING POSTS FOR THE ACADEMIC YEAR 2026-2027. (SELF FINANCE)**

**Full time Assistant – Professor for the Academic Year – 2026-2027 On Purely Temporary for one year basis for the following subjects**

| Sr. No | Department | QUALIFICATIONS | No Of Posts |
|---|---|---|---|
| 1 | Accounting & Finance | M.Com (Advance Accountancy & Finance) NET/SET/Ph.D. | 02 |
| 2 | Management Studies | MBA/MMS (HR) NET/SET/Ph.D. | 01 |
| | | MBA/MMS (Marketing) NET/SET/Ph.D. | 01 |
| 3 | Computer Science | M.Sc. (Computer Science / MCA / MCM) NET/SET/Ph.D. | 02 |
| 4 | Information Technology | M.Sc. (Information Technology / MCA / MCM) NET/SET/Ph.D. | 01 |
| 5 | Mathematics | M.Sc. ( Mathematics) NET/SET/ Ph.D. | 01 |
| 6 | Chemistry | M.Sc. (Organic Chemistry) NET/SET/Ph.D. | 01 |
| 7 | Librarian | M.LIb NET/SET/Ph.D. | 01 |
| 8 | Lab Asst for Computer Science | B.Sc. (Computer Science) | 01 |

- Applications with full details (Email address & what's app no) should reach the **CHAIRMAN, JBSP SANSTHA, Plot no: Sector-14. Panvel, Dist: Raigad. 410206.**
- Candidates may also submit the application by email to **principal@rtccs.edu.in** on or before **13th June 2026.**
  If required Contact No.-
  **MRS. Maheshwari Zirpe – 9769884544**
  **MR. NITIN VASKAR – 9821967877**

**Hon. Shri. Ramsheth Thakur (Ex M.P.)**
**CHAIRMAN**
JANARDAN BHAGAT SHIKSHAN PRASARAK SANSTHA PANVEL



**Tender Notice**

MAHAVITARAN

Following Tenders are invited from Eligible Bidders by E-tendering Process under Goregaon Division under Pen Circle Raigad District. The Details are as below-

| Sr. No. | Tender No. | Nature of Work | Estimated Cost (in Lakhs) | Amount of EMD (in Rs.) | Tender Cost Fee (in Rs.) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | EE/GRN/e-Tender/Hiring of Vehicle/T-05/ 2026-27 | Hiring of vehicle for the period of three years for Substation Maintenance Wing at Goregaon Division | 14.76 | 14,760/- | 1000+18 %GST= 1180/- |

The Tender Documents are available on MSEDCL Official Website http://etender.mahadiscom.in/ & can be downloaded from Dt. 28.05.2026 to Dt. 10.06.2026. Submission of Bid is up to Dt. 11.06.2026 till 17:00 Hrs. The Bidders are requested to get registered for E-tendering Procedure. Contact Person- Addl. Executive Engineer Tel No. 9029135601. M.S.E.D. Co. Ltd. Chinchavali, Goregaon, Tal: Mangaon Dist.-Raigad-402103.

**PRO No. 059** **Executive Engineer, Goregaon Division**



Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's

**CHANGU KANA THAKUR, ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE, NEW PANVEL (EMPOWERED AUTONOMOUS)**

**Plot no.1, Sector- 11, Khanda Colony, New Panvel (W)- 410206**

**APPLICATIONS ARE INVITED FOR THE FOLLOWING POSTS FOR THE ACADEMIC YEAR 2026-2027**

**Full time Assistant – Professors for the Academic Year – 2026-2027 On Purely Temporary for one year basis for the following subjects**

| Sr. No | Subject | Specialization | No Of Posts |
|---|---|---|---|
| 1 | Botany | M. Sc. (Botany) with NET/SET/ Ph.D | 1 |
| 2 | Chemistry | M. Sc. (Analytical Chemistry) with NET/SET/Ph.D. | 1 |
| 3 | Biotechnology | M.Sc.(Biotechnology) NET /SET/ Ph.D. | 2 |
| 4 | Information Technology | M.Sc.( Comp. Sci./ Information Technology / MCA/ MCM) with NET /SET/Ph.D. | 1 |
| 5 | Computer Science | M.Sc.( Comp. Sci./ Information Technology / MCA/ MCM) with NET /SET/Ph.D. | 3 |
| 6 | Commerce | M. Com., with NET/SET/Ph.D. | 1 |
| 7 | Accountancy | M. Com., (Accountancy) with NET/SET/Ph.D. | 1 |
| 8 | Accounting & Finance | M. Com., (Accountings & Finance) with NET/SET/Ph.D. | 1 |
| 9 | English | M. A. (English) with SET/NET/ Ph. D. | 3 |
| 10 | Economics | M. A. (Economics) with SET/ NET/ Ph. D. | 1 |
| 11 | Buss. Economics | M. A. (Buss. Economics) with SET/NET/ Ph. D | 2 |
| 12 | Geography | M. A. (Geography) with SET/ NET/ Ph. D. | 1 |
| 13 | Hindi | M. A. (Hindi) with SET/NET/ Ph. D. | 1 |
| 14 | Fashion Design | M. Sc. in Fashion Design. | 2+(CHHB-5) |
| 15 | Interior Design | M. Arch., and B. Sc. In Interior Design. | 2+(CHHB-5) |
| 16 | Performing Arts | M. A. (Dramatics)with SET/NET/ Ph. D. | 1 |
| 17 | Counsellor | Clinical Psychology or equivalent. | 1 |
| 18 | Dr. C.D. Deshmukh Co-ordinator | A post graduate experience in teaching at service commission coaching classes will be preferred **OR** Person from Government offices / Competative Eaxm Coaching Institutions can also apply | 1 |

**Note: The number of posts in different subjects may change as per the NEP 2020 to be implemented for third year UG Courses.**

- Applications with full details (Email address & what's app no) should reach the **CHAIRMAN, JBSP SANSTHA'S CHANGU KANA THAKUR ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE, Plot No. 1 Sector - 11, Khanda Colony New Panvel (W), Dist : Raigad. 410206.**
- Candidates may also submit the application by email to **principal@ckthakurcollege.net** on or before **13th June 2026.**
  If required Contact No. **Mr. Pralhad Thakur – 9022600288.**

**Hon. Shri. Ramsheth Thakur (Ex M.P.)**
**CHAIRMAN**
JANARDAN BHAGAT SHIKSHAN PRASARAK SANSTHA PANVEL



### जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविणेत येत आहे की, मौजे करवले बुद्रुक, ता–पनवेल, जि–रायगड, येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तीच्या मालकी हक्काची, मिळकत वा जमीन ही आमचे आशिलांनी कायमस्वरूपी विकण्याचे ठरविले आहे. तरी, सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणेः

**– मिळकतीचे वर्णन –**

मौजेः करवले बुद्रुक, तालुका– पनवेल, जिल्हा – रायगड

| गाव | भोगवटदारांचे नाव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे आ.पॉ. | आकाराणी रू.पै. |
|---|---|---|---|---|
| करवले बुद्रुक | १ उमर मेहमुद्दीन पटेल<br>२ हुसेमियन मेहमुद्दीन पटेल<br>३ निसार मेहमुद्दीन पटेल<br>४ सिराज मेहमुद्दीन पटेल<br>५ मो सुफयान मेहमुद्दीन पटेल<br>६ रूक्साना बशिर अहमद पटेल<br>७ सुगरा म शफी पटेल<br>८ रिहाना अब्दुल मुत्तलीब पटेल<br>९ मोसीना ए अन्वर डिवडे<br>१० नसिमा गुलाम रसुल डोलारे<br>११ नफीसा नासिर पटेल<br>१२ मो. रफिक मेहमुद्दीन पटेल | २४/२ | ०.१३.१०<br>०.०३.००<br>०.१६.१०<br>हे.आर.पॉ | ०.२८ |
| | सर्व राहणार– तलोजे पाचनंद, ता. पनवेल, जि. रायगड | एकुण | ०.१६.१० | |

सदरहू जागा, जमिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार–मदार, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधीतांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे

जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजीत व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीच्या न येणाऱ्या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : २६/०५/२०२६**

**सही/–**
**ॲड. सरिता महेंद्र साखरे**
पत्ता– बंन्सल असोसिएस, पहिला मझला प्लॉट नं.३०, सेक्टर १/२, रोड नं.४ नविन पनवेल, बालाजी मंदिरच्या समोर ता. पनवेल जि. रायगड. ४१०२०६.



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मौजे चिंचवली तर्फे वाजे, ता. पनवेल, जि. रायगड येथील **रसिकलाल नरसिंह पटेल व इतर ५** यांचे नावे असलेली, ताबेकब्जातील तसेच मालकी हक्काची, खुद्द स्वरूपाची खालील वर्णनाची शेतजमिन आमचे आशिलांनी खरेदीखताने विकत घेण्याचा विचार आहे.

परीशिष्ट
शेतजमिनीचे वर्णन
मौजे चिंचवली तर्फे वाजे, तालुका पनवेल, जि.रायगड.

| कब्जेदारांचे नाव | गट नं./ सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| खुशालचंद्र ललितप्रसाद पोद्दार<br>तेजस प्रविणचंद्र शहा<br>उमेश लक्ष्मण शिंदे<br>अमृताबेन नरसिंह पटेल<br>भारत नरसिंह पटेल<br>रसिकलाल नरसिंह पटेल | ८६ | - | ०.२४.८० | १.१२ |

सबब वर नमुद शेतजमिन मिळकतीवर, वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, ॲटचमेंट, लीज एम.ओ.यु. वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून **१४ दिवसाच्या आत** हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर वर नमुद मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकती, तक्रारी दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्यासोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल, याची तमाम लोकांनी/नागरिकांनी कृपया नोंद घ्यावी.

**दिनांक : २८/०५/२०२६**

**सही/–**
**ॲड विजय भगत ॲन्ड असोशिएटस्**
**(ॲडव्होकेट ॲन्ड लिगल कन्सलटंट)**
**शॉप नं. १२८, पहिला मजला, नगरपालीका शॉपीग कॉम्पलेक्स, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.**
**मो. ९८२०६०७५७२/९३२२६५२३१९**
Email.vijaybhagat४३@gmail.com



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मौजे चिंचवली तर्फे वाजे, ता. पनवेल, जि. रायगड येथील **रसिकलाल नरसिंह पटेल व इतर ५** यांचे नावे असलेली, ताबेकब्जातील तसेच मालकी हक्काची, खुद्द स्वरूपाची खालील वर्णनाची शेतजमिन आमचे आशिलांनी खरेदीखताने विकत घेण्याचा विचार आहे.

परीशिष्ट
शेतजमिनीचे वर्णन
मौजे चिंचवली तर्फे वाजे, तालुका पनवेल, जि.रायगड.

| कब्जेदारांचे नाव | गट नं./ सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| खुशालचंद्र ललितप्रसाद पोद्दार<br>तेजस प्रविणचंद्र शहा<br>उमेश लक्ष्मण शिंदे<br>अमृताबेन नरसिंह पटेल<br>भारत नरसिंह पटेल<br>रसिकलाल नरसिंह पटेल | ८५ | - | १.२९.८०<br>पो.ख.०.१२.१०<br>१.४१.९०<br>पैकी विक्री क्षेत्र ०.७५.२०<br>हे.आर.चौ.मी. | १२.५३ |

सबब वर नमुद शेतजमिन मिळकतीवर, वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, ॲटचमेंट, लीज एम.ओ.यु. वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून **१४ दिवसाच्या आत** हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर वर नमुद मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकती, तक्रारी दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्यासोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल, याची तमाम लोकांनी/नागरिकांनी कृपया नोंद घ्यावी.

**दिनांक : २८/०५/२०२६**

**सही/–**
**ॲड विजय भगत ॲन्ड असोशिएटस्**
**(ॲडव्होकेट ॲन्ड लिगल कन्सलटंट)**
**शॉप नं. १२८, पहिला मजला, नगरपालीका शॉपीग कॉम्पलेक्स, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.**
**मो. ९८२०६०७५७२/९३२२६५२३१९**
Email.vijaybhagat४३@gmail.com

# नवी मुंबईत दूषित पाणीपुरवठा

## महापालिकेकडून तातडीने तपासणीचे आदेश



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबईत सुरू असलेल्या पाणीकपातीच्या पार्श्वभूमीवर आता गढूळ आणि दुर्गंधीयुक्त पाणीपुरवठ्याच्या तक्रारींमध्ये वाढ झाली आहे. यामुळे नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. याची तात्काळ दखल घेत महापौर सुजाता पाटील यांनी सोमवारी पाणीपुरवठा विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची तातडीची बैठक घेतली. या वेळी पाणी तपासणीचे निर्देश देण्यात आले.

जुईनगर, घणसोली, कोपरखैरणे, नेरुळ अशा विविध भागांतील नागरिकांनी नळातून येणारे पाणी पिण्यायोग्य नसल्याची तक्रार केली आहे. काही ठिकाणी पाण्याला गढूळ रंग, तर काही भागांत दुर्गंधी येत असल्याचे नागरिकांनी सांगितले. त्यामुळे पाणीपुरवठा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून नागरिकांच्या आरोग्याचा मुद्दा पुढे आला आहे.

उन्हाळ्यामुळे आधीच शहरातील पाणीस्थिती तणावपूर्ण बनली असताना आता दूषित पाणीपुरवठ्यामुळे नागरिकांची चिंता वाढली आहे. अनेक रहिवाशांना पिण्यासाठी आणि स्वयंपाकासाठी वेगळे पाणी विकत घ्यावे लागत आहे. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि आजारी व्यक्तींच्या आरोग्यावर त्याचा परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. काही भागांत नळातून येणाऱ्या पाण्यात सूक्ष्म कचरा किंवा कीटक आढळल्याच्याही तक्रारी पुढे आल्या आहेत.

जुईनगर सेक्टर २५ परिसरातील रहिवाशांनी तर महापालिकेच्या जलशुद्धीकरण यंत्रणेवरच प्रश्न उपस्थित केले आहेत. स्वच्छ पाणी हा नागरिकांचा मूलभूत हक्क आहे, उपकार नाहीत. शहरात पाणीकपात सुरू असताना जे पाणी मिळत आहे तेही दूषित असेल, तर नागरिकांनी नेमके करायचे काय, असा सवाल स्थानिकांकडून उपस्थित केला जात आहे.

या वाढत्या तक्रारींची दखल घेत नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील यांच्यातर्फे सोमवारी महापौर दालनात पाणीपुरवठा विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची तातडीची बैठक घेण्यात आली. अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीत शहरातील पाणीपुरवठा व्यवस्थेचा सविस्तर आढावा घेण्यात आला. मोरबे धरणातील उपलब्ध पाणीसाठा, सुरू असलेली नियोजित पाणीकपात आणि दूषित पाणीपुरवठ्याच्या तक्रारी या मुद्द्यांवर मुख्यत्वे चर्चा करण्यात आली.

हवामान खात्याने यंदा मान्सून उशिरा येण्याची आणि पावसाचे प्रमाण कमी राहण्याची शक्यता व्यक्त केल्याने उपलब्ध पाणीसाठा जपून वापरण्याची आवश्यकता बैठकीत अधोरेखित करण्यात आली. त्याच वेळी पाणीकपातीच्या काळात नागरिकांना स्वच्छ आणि सुरक्षित पाणी मिळणे ही प्रशासनाची जबाबदारी असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

बैठकीत दिघा ते बेलापूरपर्यंतच्या सर्व नोड आणि प्रभागांमध्ये तातडीने पाण्याचे नमुने घेऊन चाचण्या करण्याचे निर्देश देण्यात आले. जलवाहिन्यांमध्ये गळती, तांत्रिक बिघाड किंवा दूषित पाणी मिसळण्याच्या शक्यता तपासण्यासाठी विशेष तपासणी मोहीम सुरू करण्यात आली आहे. पावसाळ्यापूर्वीच अशा तक्रारी वाढत असल्याने नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने कोणतीही हलगर्जीपणा होऊ नये, अशा सूचनाही अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.दूषित पाण्याचे मूळ कारण शोधून त्यावर तातडीने प्रक्रिया करण्याचे आदेश देण्यात आले असून संबंधित भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर 'वॉटर टेस्टिंग' केले जाणार आहे.

**नागरिकांना आवाहन**

नागरिकांनी आपल्या परिसरात गढूळ किंवा दुर्गंधीयुक्त पाणी येत असल्यास महापालिकेच्या हेल्पलाइनवर किंवा अधिकृत संकेतस्थळावर तक्रार नोंदवावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## 'राज्य मध्यवर्ती ग्रंथालयाच्या नवीन इमारतीचे काम निर्धारित वेळेत पूर्ण करा'



**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील विद्यार्थी, संशोधक आणि वाचनप्रेमींसाठी आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने उभारण्यात आलेल्या राज्य मध्यवर्ती ग्रंथालयाच्या नवीन इमारतीची कामे निर्धारित वेळेत व गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करण्याच्या सूचना उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

राज्य मध्यवर्ती ग्रंथालयाच्या नवीन इमारत बांधकामाची मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी पाहणी केली यावेळी उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, महाराष्ट्र राज्य कला संचालनालयाचे संचालक डॉ. किशोर इंगळे, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळाचे संचालक विनोद दांडगे, ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, बांधकाम विभागाचे अधिकारी तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.

यावेळी मंत्री चंद्रकांतदादा पाटील म्हणाले की, या इमारतीचे बांधकाम अंतिम टप्प्यात आले असून फर्निचर, अंतर्गत सजावट आणि इतर पूरक कामे सुरू आहेत. या सर्व कामांमध्ये दर्जा राखून ती वेळेत पूर्ण करावीत. आधुनिक तंत्रज्ञान आणि अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज असे हे ग्रंथालय राज्यातील विद्यार्थ्यांसाठी, संशोधकांसाठी तसेच वाचन संस्कृती जोपासणाऱ्या नागरिकांसाठी महत्त्वपूर्ण ज्ञानकेंद्र ठरणार आहे. अभ्यास, संशोधन आणि ज्ञानवृद्धीसाठी आवश्यक सुविधा या ग्रंथालयात उपलब्ध करून देण्यात येणार असून हे ग्रंथालय लवकरच नागरिकांच्या सेवेत दाखल होईल, असेही मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी सांगितले.

## महावितरणकडून मान्सूनपूर्व कामांसह वीज ग्राहकांच्या समस्या सोडवण्यावर भर



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मोहोपाडा विजवितरण कार्यालयाकडून मान्सून पुर्व कामे गेल्या काही दिवस सुरु असून वृक्ष फांदी छाटणी, रिजम्परिंग,उच्च दाब वाहिनीची दुरुस्ती आणि इतर मेंटेनन्सची सर्व कामे अंतिम टप्प्यात आली आहेत. विज वितरणाचे अधिक्षक अभियंता बिक्कड साहेब, कार्यकारी अभियंता शिंदे साहेब,उपकार्यकारी अधिकारी राख साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली मोहोपाडा विज वितरणाचे उपअभियंता लक्ष्मीकांत लालासाहेब गलांडे पाटील यांच्यावतीने मोहोपाडा परिसरात सुरू आहेत.मोहोपाडासह आसपासच्या परिसरातील फांदी छाटणी, उच्च दाब वाहिनी बदलणे आदी कामे सुरु आहेत.

दरम्यान मोहोपाडा परिसरात नविन ट्रान्स्फार्म व डिपी बसविण्यासाठी जागा निश्चित करण्यात आली.तसेच श्री गणपती मंदिरामागील परिसरात नव्याने दोन विजपोल बसविण्याचे काम सुरू करण्यात आले.तसेच मोहोपाडा प्रवेशद्वाराजवळील झुकलेला पोल काढणार असून त्याजागी नवीन विजपोल बसविण्यात येत आहे.यावेळी मोहोपाडा विजवितरणाचे उप अभियंता लक्ष्मीकांत गलांडे, लाईनमन शिंदे, व्यापारी असोसिएशनचे प्रदिप पाटील,अमित शहा आदीसह ग्रामस्थ उपस्थित होते.

## नवी मुंबईत बांधकामांसाठी पिण्याच्या पाण्याचा वापर

**नवी मुंबई : बातमीदार**

घणसोली विभागासह संपूर्ण नवी मुंबईमध्ये सुरू असलेल्या बांधकाम प्रकल्पांमध्ये मोठ्या प्रमाणावर पिण्यायोग्य पाण्याचा वापर होत असल्याने सर्वसामान्य नागरिकांवर अन्याय होत असल्याची तीव्र प्रतिक्रिया घणसोली येथील भाजपाचे नगरसेवक गणेश सकपाळ यांनी व्यक्त केली आहे.

सध्या नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत नागरिकांवर पाणी कपात लागू करण्यात आलेली असताना, दुसरीकडे बांधकामांसाठी मोरबे धरणातील तसेच एमआयडीसीमार्फत येणारे पिण्याचे पाणी वापरले जात असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. पालिकेकडून या पाणी चोरीकडे अर्थपूर्ण दुर्लक्ष होत असल्याचा आरोप होऊ लागला आहे.

याबाबत त्यांनी नवी मुंबई महानगरपालिका प्रशासनाकडे अधिकृत पत्राद्वारे मागणी केली असून, महानगरपालिकेच्या सिवरेज ट्रीटमेंट प्लांटमधून प्रक्रिया केलेले पाणी सर्व बांधकाम प्रकल्पांना उपलब्ध करून द्यावे, प्रक्रियायुक्त पाणी वापरणे बंधनकारक करण्याची आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

## उरणमध्ये ४० मुलांनी घेतले छायाचित्रणाचे धडे



**उरण : वार्ताहर**

निसर्गाने नाटलेला उरण तालुका औद्योगिक दृष्ट्या महत्वाचा तालुका आहे. येथील नवतरुण विकासाच्या दृष्टीने विविध क्षेत्राचे शिक्षण घेत आहेत. मात्र आवड असूनही छायाचित्रणाचे प्रशिक्षण घेता येत नव्हते. याचाच सारासार विचार करून, "फोटोग्राफी प्रमोशन ट्रस्ट" यांच्या माध्यमातून आणि जेएनपीए यांच्या सहयोगातून दोन दिवसीय कार्याधळेचे आयोजन करण्यात आले होते. २३, २४ मे रोजी झालेल्या या कार्यशाळेत एकूण ४० विद्यार्थी सहभागी झाले होते.

छायाचित्रणाची आवड प्रत्येकालाच असते असं नाही. मात्र सध्याच्या मोबाईल युगामध्ये प्रत्येकाच्या हातामध्ये मोबाईल कॅमेरा उपलब्ध असल्याने, प्रत्येकजण या कॅमेऱ्यामध्ये आठवणी संग्रहित करत असतो. तर अनेकजण सध्याच्या सोशलमीडियासाठी फोटो, व्हिडीओ मोबाईल किंवा कॅमेराच्या सहाय्याने तयार करत असतात. मात्र याबाबतचे तांत्रिक ज्ञान नसल्याने प्रभावी चित्रण करता येतं नाही. अशाच छायाचित्रणाची आवड असणाऱ्या ४० विद्यार्थ्यांना घेऊन उरणमधील "उरण एजयुकेशन सोसायटी" शाळेच्या ऑडिटरियम होलमध्ये २३ आणि २४ मे रोजी कार्यशाळा घेण्यात आली.

या कार्यशाळेमध्ये छायावचित्रणाचा जन्म, छायाचित्रणाची मुख्य मुलसूत्रे, नेसर्गिक प्रकाषाचा वापर याबाबत उपयुक्त माहिती देण्यात आळी. तर कार्यशालेळा "फोटोग्राफी प्रमोशन ट्रस्ट"चे सर्वेसर्वा आणि सामान्य जीवनातील दुःखद–हास्यपूर्ण सामाजिक रंगमंचातील नग्न वास्तव उघड करून भारतीय उपखंडात अपार प्रशंसा आणि सन्मान मिळवणारे. २००५ मध्ये ते नॅशनल जिओग्राफीच्या "ऑल रोड्स फोटोग्राफी प्रोग्राम"चे चार पुरस्कार विजेत्यांपैकी एक असणारे. तसेच २०१६ मध्ये त्यांच्या सामाजिक कार्यासाठी त्यांना भारतातील सर्वोच्च नागरी सन्मानांपैकी एक असलेल्या पद्मश्री पुरस्काराने सन्मानीत सुप्रसिद्ध छायाचित्रकार सुधारक ओलवे यांचे मार्गदर्शन लाभले. तर छायाचित्रकार/पत्रकार विरेश मोडखरकर यांनी यावेळी माणूस आणि कॅमेरा यातील साम्य आणि त्यावर आधारीत छायाचित्रण यावर प्रकाश टाकला. अनेक तज्ञ् मान्यवरांनी दोन दिवसीय कार्यशाळेत मोलाचे मार्गदर्शन केले.

फोटोग्राफी प्रमोशन ट्रस्ट आणि जेएनपीए यांच्या माध्यमातून घेण्यात आलेल्या या कार्याधळेतील विद्यार्थ्यांना छायाचित्रणासंदर्भात अधिक तांत्रिक आणि प्रत्यक्ष अनुभव मिळावे या क्षेत्रात त्यांनी तज्ञ् व्हावे यासाठी साप्ताहाच्या प्रत्येक शनिवारी छायाचित्रण प्रशिक्षण वर्ग घेण्यात येणार असल्याची माहिती सुधारक ओलवे यांनी दिली. तर ज्यांना या प्रशिक्षणाचा भाग व्हायचे आहे त्यांनी देखील या प्रशिक्षण वर्गाचा भाग व्हावे असे सांगितले.

**छायाचित्रणाची आवड होती मात्र माहिती नव्हती. माझ्याकडे असणाऱ्या माहितीक्षा अधिक माहिती मिळावी या उद्देशाने मी कार्यशाळेत सहभागी झाले. मी विचार केला नव्हता की मला एव्हडा शिकता येईल. मात्र माझ्या विचारापलीकडे शिकता आलं. कार्यशालेला मार्गदर्शन करणारी टीम उत्तम होती. ज्यामुळे मला उत्तमरीत्या छायाचित्रांनाचे सुरुवातीचे मार्गदर्शन झाले.**

**–तन्वी पोवार (प्राधिक्षणार्थी)**

## शिरवणे येथे आरोग्यवर्धिनी केंद्र

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

शिरवणे गांव आणि नेरुळ परिसरातील नागरिकांना आता त्यांच्या घराजवळच मोफत आरोग्य सुविधा उपलब्ध होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील केंद्र सरकारच्या आयुष्यमान आरोग्य मंदिर योजनेअंतर्गत शिरवणे गांव येथील गांवदेवी मैदानात नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र भाजप नगरसेविका माधुरी सुतार यांच्या मागणी आणि पाठपुराव्या नुसार उभारण्यात आले आहे. या केंद्राची सेवा नागरिकांसाठी लवकरात लवकर सुरु करावी, अशी मागणी माधुरी सुतार यांनी महापालिका मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. राजेश म्हात्रे यांच्याकडे केली.

त्याअनुषंगाने डॉ. राजेश म्हात्रे यांनी शिरवणे आरोग्यवर्धिनी केंद्राला भेट दिली. याप्रसंगी नगरसेविका माधुरी सुतार, शिरवणे नागरी आरोग्य केंद्राच्या प्रमुख डॉ, पुष्पा जवादे, संदीप सुतार, अनिता पाटील, जयश्री सुतार आदि मान्यवर उपस्थित होते.

आयुष्यमान आरोग्यवर्धिनी केंद्र नागरिकांच्या सेवेकरिता त्वरित उपलब्ध करु, अशी ग्वाही डॉ. राजेश म्हात्रे यांनी यावेळी दिली. शिरवणे नागरी आरोग्य केंद्रात सकाळी ९ ते दुपारी १ वाजेपर्यंत ओपीडी चालू असते. मात्र, आरोग्यवर्धिनी केंद्रामुळे नागरिकांना आता दुपारी २ ते रात्री १० वाजेपर्यंत आरोग्य सेवा उपलब्ध होणार आहे. त्यामुळे या आरोग्य सुविधेचा विभागातील नागरिकांनी लाभ घ्यावा,

# एमएमआरमध्ये लवकरच साकारणार फ्लेमिंगो ब्ल्यू कार्बन नागरी संकुल



**नवी मुंबई : बातमीदार**

मुंबई महानगर प्रदेशात (एमएमआर) जागतिक स्तरावरील "फ्लेमिंगो ब्ल्यू कार्बन अर्बन कॉम्प्लेक्स" उभारण्याच्या प्रस्तावाची केंद्र सरकारने दखल घेत महाराष्ट्र राज्य पाणथळ प्राधिकरणाला या विषयावर "प्राधान्याने" कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

५ जून रोजी साजऱ्या होणाऱ्या जागतिक पर्यावरण दिनाच्या पार्श्वभूमीवर नॅटकनेक्ट फाउंडेशनने यासंदर्भातील प्रस्ताव पंतप्रधानांकडे सादर केला. या श्वेतपत्रिकेत पाणथळ जागा, खारफुटी, चिखलपट्टे, फ्लेमिंगो अधिवास, कार्बन शोषण, पर्यावरण पर्यटन आणि हवामान वित्तीय व्यवस्था यांना एकाच हवामान–प्रतिरोधक चौकटीत जोडणारे जागतिक मॉडेल म्हणून एमएमआरची उभारणी करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे.

या श्वेतपत्रिकेनुसार फ्लेमिंगो हे केवळ स्थलांतरित पक्षी नसून परिसंस्थेच्या आरोग्याचे निर्देशक आहेत. त्यांचे अस्तित्व एमएमआरमधील परस्पर जोडलेल्या पाणथळ जागा, खारफुटी आणि भरती–ओहोटीवर आधारित चिखलपट्ट्यांच्या आरोग्यावर अवलंबून आहे. ही परिसंस्था मोठ्या प्रमाणात "ब्ल्यू कार्बन" साठवणाऱ्या नैसर्गिक कार्बन सिंकचे काम करते.

ठाणे खाडी, शिवडी चिखलपट्टे, उरण पाणथळ प्रदेश आणि नवी मुंबई किनारी पट्ट्यातील फ्लेमिंगोंची हालचाल ही एकात्मिक भरती–ओहोटी परिसंस्थेच्या सुदृढतेचे प्रतीक असल्याचेही श्वेतपत्रिकेत नमूद करण्यात आले आहे.

श्वेतपत्रिकेनुसार खारफुटी आणि भरती–ओहोटी पाणथळ प्रदेश हे जगातील सर्वाधिक कार्बन साठवणाऱ्या परिसंस्थांपैकी आहेत. हे प्रदेश पूर नियंत्रण, उष्णता कमी करणे आणि जैवविविधतेचे संरक्षण करण्याबरोबरच मोठ्या प्रमाणात कार्बन शोषून घेतात. पाणथळ प्रदेशांना पुनर्विकासयोग्य भूखंड म्हणून पाहण्याऐवजी "जिवंत हवामान पायाभूत व्यवस्था" म्हणून पाहिले पाहिजे, असेही त्यात नमूद करण्यात आले आहे.

ब्ल्यू कार्बन क्रेडिट्स, जैवविविधता वित्त, पर्यावरण पर्यटन आणि पूरनियंत्रणामुळे होणारी आर्थिक बचत यांद्वारे खारफुटी आणि किनारी परिसंस्था सातत्याने महसूल निर्माण करू शकतात, असे श्वेतपत्रिकेत म्हटले आहे.

नॅटकनेक्टचे संचालक बी. एन. कुमार यांनी पंतप्रधानांना दिलेल्या निवेदनात पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील पाणथळ प्रदेशांकडे "मालमत्ता विकासासाठी वापरता येणारे भूखंड" म्हणून पाहिले जात असल्याबद्दल चिंता व्यक्त केली.

केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने (एमओईएफसीसी) अवघ्या २४ तासांत प्रतिसाद देत प्रस्तावाचे कौतुक केले. मंत्रालयातील वेटलँड कॉम्प्लायन्स विभागाचे सायंटिस्ट 'एफ' पंकज वर्मा यांनी स्वाक्षरी केलेल्या पत्रात राज्य पाणथळ प्राधिकरणाला या विषयावर "प्राधान्याने" कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

राज्य प्राधिकरणाने केलेल्या कारवाईचा अहवाल नॅटकनेक्ट आणि मंत्रालयाला सादर करण्यासही सांगण्यात आले आहे.

दरम्यान, श्वेतपत्रिकेत डीपीएस फ्लेमिंगो लेकच्या १२ हेक्टर भूखंडाच्या सिडकोकडून प्रस्तावित आर्थिक मूल्यांकनाचा मुद्दाही उपस्थित करण्यात आला आहे. हा भूखंड संवर्धन राखीव क्षेत्र म्हणून विचाराधीन असताना अल्पकालीन रिअल इस्टेट मूल्यांकनामुळे पाणथळ प्रदेशांचे दीर्घकालीन पर्यावरणीय आणि आर्थिक महत्त्व दुर्लक्षित होत असल्याचा इशारा श्वेतपत्रिकेत देण्यात आला आहे.

"ही परिसंस्था ओसाड जमीन नाही. त्या जिवंत हवामान प्रणाली आहेत ज्या कार्बन साठवतात, पूर रोखतात, उष्णता कमी करतात आणि जैवविविधतेला आधार देतात," असे कुमार यांनी सांगितले.

एमएमआरमधील पर्यावरण कार्यकर्त्यांनी या प्रस्तावाला जोरदार पाठिंबा दिला आहे. सागर शक्तीचे नंदकुमार पवार यांनी पाणथळ प्रदेशांच्या नाशाचा वाढत्या पूरधोक्याशी थेट संबंध जोडला. नैसर्गिक भरती–ओहोटी मार्ग आणि चिखलपट्ट्यांचा नाश झाल्यास परिसराची नैसर्गिक पूररोधक क्षमता कमी होते आणि अतिवृष्टीदरम्यान आर्थिक नुकसान वाढते, असा इशारा त्यांनी दिला.

खारघर हिल्स अँड वेटलँड्स फोरमच्या ज्योती नाडकर्णी यांनी फ्लेमिंगोंना "महत्त्वपूर्ण परिसंस्था प्रजाती" संबोधले. त्यांच्या खाद्य शोधण्याच्या प्रक्रियेमुळे चिखलपट्ट्यांचे वातन होते, गाळाला ऑक्सिजन मिळतो आणि निळ्या–हिरव्या शेवाळाचे संतुलन राखले जाते, ज्यामुळे सागरी जैवविविधता टिकून राहते, असे त्यांनी सांगितले.

फ्लेमिंगो अधिवासांचे संरक्षण केल्यास मासे आणि क्रस्टेशियन प्रजाती वाढतील, सागरी परिसंस्था सुधारेल आणि मच्छीमारांच्या उपजीविकेलाही थेट मदत होईल, असे त्या म्हणाल्या.

पाम बीच ग्रीन्सचे संयोजक श्रीकांत पाटकी यांनी मुंबईचे दीर्घकालीन वैभव अधिक काँक्रीट बांधकामात नसून पाणथळ जागा, खारफुटी आणि फ्लेमिंगो अधिवासांच्या संरक्षणात असल्याचे सांगितले. या परिसंस्था पूरापासून संरक्षण करण्याबरोबरच पर्यावरण पर्यटन आणि हरित रोजगारालाही चालना देतात, असे ते म्हणाले.

पर्यावरणवाद्यांनी इशारा दिला की पाणथळ प्रदेशांवरील अतिक्रमण, प्रदूषण आणि विस्कळीत नागरीकरण कायम राहिल्यास भारतातील सर्वात मोठ्या हवामान–संधींपैकी एक संधी नष्ट होऊ शकते. एल–निनोशी संबंधित हवामान बदल आणि अतिवृष्टीच्या धोक्याच्या पार्श्वभूमीवर एमएमआरमधील पाणथळ प्रदेश कमकुवत झाल्यास मुंबईला पूर, उष्णतेच्या लाटा, किनारी अस्थिरता आणि आर्थिक धयांचा अधिक मोठा फटका बसू शकतो.

# कर्जत नवीन रेल्वेस्थानकाची खासदार बारणेंकडुन पाहणी, नवीन उड्डाणपूल भारणार

**कर्जत : प्रतिनिधी**

पनवेल – कर्जत नवीन रेल्वे मार्ग तयार होत आहे. त्याची पाहणी करण्यासाठी खासदार श्रीरंग बारणे कर्जतला आद्ययावत नवीन स्थानक होत आहे. त्याची पहाणी करण्यासाठी आमदार महेंद्र थोरवे यांच्या समवेत आले होते. यावेळी मुंबई रेल्वे विकास महामंडळाचे अधिकारी उपस्थित होते.



कर्जतचे प्रवेशद्वार म्हणजे वाहतूक कोंडीचे मुख्य ठिकाण. तेथेच रेल्वे प्रवाशांना बाहेर पडण्यासाठी मार्ग तसेच स्थानकावर जाण्यासाठी मार्ग असल्याने या परिसरात भविष्यात प्रचंड वाहतूक कोंडी होणार असल्याने कोणत्याही परिस्थितीत जुन्या रेल्वे पुलाच्या बाजूला नवीन रेल्वे उड्डाण पूल व्हावा. अशी भूमिका घेऊन खासदार बारणे आणि आमदार थोरवे यांनी नवीन उड्डाण पुलासाठी राज्य शासनाच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे पाठपुरावा करून तो उभारण्याचा 'शब्द' दिला.

मंगळवारी नव्याने होत असलेल्या कर्जत रेल्वे स्थानकाची पाहणी करण्यासाठी खासदार श्रीरंग बारणे, आमदार महेंद्र थोरवे, मुंबई रेल्वे विकास महामंडळाचे अधिकारी अमरीत आनंद, योगेश शर्मा, मनीष कुमार, लक्ष्मीकांत जनपासे, माथेरानचे नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी, नगरसेवक संकेत भासे, किशोर कदम, वैभव सुरावकर, रोहित ओसवाल, माजी सभापती राहुल विशे, दिनेश कडू, प्रदीप घाडगे, पंकज ओसवाल, बजरंग श्रीखंडे, प्रथमेश मोरे आदींसह आले.

त्यांना नवीन होणाऱ्या रेल्वे स्थानकाचा आराखडा मुंबई रेल्वे विकास महामंडळाचे अधिकारी अमरीत आनंद, योगेश शर्मा यांनी समजावून सांगितला. यावेळी कर्जतचे जुने रेल्वे स्थानक आणि आता नव्याने उभारण्यात येणारे रेल्वे स्थानक यांना कसे जोडणार? असा प्रश्न खासदार बारणे व आमदार थोरवे यांनी विचारला. त्यावर ते समाधानकारक उत्तर देऊ शकले नाहीत. आमदार महेंद्र थोरवे यांनी येथे नवीन रेल्वे उड्डाण पुलाची आवश्यकता आहे. ते यापूर्वीच आराखड्यात घ्यायला हवे होते. असे सूचित केल्यावर ते आमच्या कडून राहिले. असे उत्तर शर्मा यांनी दिले. त्यानंतर खासदार बारणे आणि आमदार थोरवे यांनी राज्य शासनाच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे प्रस्ताव ठेऊन येथे नवीन रेल्वे उड्डाण पूल बांधण्यात येईल. त्यासाठी रेल्वे प्रशासनानेही सहकार्य करावे. असे सूचित केले.

खासदार बारणे यांनी, 'आम्ही रेल्वे प्रवाशांना सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी प्रयत्न करीत असतो. कोरोना पूर्वीचे कर्जत स्थानकातील थांबे सुरु करावेत. यासाठी मी पाठपुरावा करीत आहे. महिलांसाठी विशेष लोकल सुरु व्हावी. अशी मागणी आहे. महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने ही मागणी रास्त आहे. त्यासाठी प्रयत्न करू. आम्ही आत्ताच पनवेल, चिखले, पोयंजे, चौक रेल्वे स्थानकांची व मार्गीकेची पहाणी केली असून ८५ टक्के काम पूर्ण झाले आहे. या नवीन मार्गीकेच्या व स्थानकांमध्ये असलेल्या त्रुटी दूर करून नवीन कर्जत स्थानक आद्ययावत कसे होईल. यासाठी आमचे पूर्ण लक्ष आहे.' असे सांगितले. मुंबई रेल्वे विकास महा मंडळाचे अधिकारी योगेश शर्मा यांनी, 'कर्जत – पनवेल जुनी मार्गीका चालूच राहील. या मार्गीकेचे दुपदरी करण करण्यात येणार आहे.

## मंत्री भरत गोगावले यांच्या उपस्थितीत श्रीवर्धन मतदारसंघासाठी बीएलए प्रशिक्षण

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव कुणबी भवन येथे बुधवार दि.२७ मे रोजी शिवसेनेतर्फे मंत्री भरत गोगावले यांच्या प्रमुख उपस्थितीत १९३ श्रीवर्धन मतदार संघासाठी बीएलए संदर्भात प्रशिक्षण व मार्गदर्शन शिबीर उत्साहात संपन्न झाले. सदर शिबिरात मंत्री भरत गोगावले व शिवसेनेचे राज्य समन्वयक अविनाश सणस यांनी उपस्थित शिवसेना,युवासेना पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मौलिक असे मार्गदर्शन केले.



या कार्यक्रमास रायगड – पालघर जिल्ह्याचे विभागीय संपर्कप्रमुख प्रदीप खाडे,शिवसेनेचे जिल्हा प्रमुख प्रमोद घोसाळकर,रायगड लोकसभा संपर्कप्रमुख अनिल नवगणे,महिला जिल्हा संघटिका नीलिमा घोसाळकर,रायगड जिल्हा युवसेनाप्रमुख विपुल उभारे,माणगाव तालुकाप्रमुख अँड.महेंद्र माणकर,माजी उपजिल्हा प्रमुख रमेश मोरे,माजी नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार,अँड.अच्युत तोंडलेकर,राजिप सदस्य अविनाश नलावडे,माणगाव शहर संपर्क प्रमुख प्रसाद धारिया,शहरप्रमुख नितीन दसवते,रोहित रातवडकर,सचिन मोरे,उपशहरप्रमुख फैमिद जामदार,ज्ञानेश्वर उतेकर,सौरभ खैरे आदींसह तालुका शिवसेनेचे,युवासेनेचे पदाधिकारी,कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमात श्रीवर्धन मतदार संघातील कार्यकर्त्यांनी मंत्री भरत गोगावले यांच्या उपस्थितीत शिवसेना शिंदे गटात जाहीर प्रवेश केला. यावेळी शिवसेनेचे राज्य समन्वयक अविनाश सणस यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना बीएलए संदर्भात योग्य ते मार्गदर्शन करीत प्रशिक्षण दिले.



# हाळखुर्द ग्रामपंचायत अधिकाऱ्याची ग्रामसभेला दांडी; सरपंच, उपसरपंचांकडून कारवाईची मागणी



**खोपोली : प्रतिनिधी**

ता. २६.मे, – नियोजित ग्रामसभेला ग्रामपंचायत अधिकारी गैरहजर राहिल्याने हाळखुर्द ग्रामपंचायत सरपंच शबनम हनिफ मुल्ला, उपसरपंच आजिम मांडलेकर यांच्या सह सर्व सदस्यांनी सभापती कृष्णा पारंगे याना लेखी तक्रारी निवेदन देत कारवाईची मागणी केली. विशेष म्हणजे आजारपणामुळे गैरहजर ग्रामपंचायत अधिकारी सूरज मुकादम कारवाई होणार समजल्यावर पंचायत समिती कार्यालयात उपस्थित झाला. हाळखुर्द ग्रामपंचायतीची मासिक सभा सोमवार २५ मे रोजी आणि ग्रामसभा दुपारी एक वाजता आयोजित करण्यात आली होती. ग्रामसभेचा अजेंडा पाच दिवसांपूर्वी ग्रामपंचायत अधिकारी सुरज मुकादम यांनी काढला होता. सोमवारी हाळखुर्द ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच, सर्व सदस्य आणि शेकडो ग्रामस्थ ग्राम सभेसाठी जमा झाले होते. परंतु ग्रामपंचायत अधिकारी सूरज मुकादम अचानक रजेवर गेले. ग्रामपंचायत अधिकारी गैरहजर असल्याने ग्रामसभा तहकूब करण्याची पाळी आल्याने सर्व ग्रामस्थ संतप्त झाले. ग्रामपंचायत अधिकारी सुरज मुकादम विरोधात या अगोदर देखील अनेक तक्रारी असल्याने संतप्त सरपंच सदस्यांनी पंचायत समिती कार्यालय गाठत सभापती कृष्णा पारंगे यांना ग्रामपंचायत अधिकारी सुरज मुकादम विरोधात कारवाईची मागणी केली. यावेळी कनिष्ठ गटविकास अधिकारी प्रदीप कांबळे यांना देखील तक्रारी निवेदन देण्यात आले.

कारवाई होणार हे समजताच ग्रामपंचायत अधिकारी सूरज मुकादम पंचायत समिती कार्यालयात उपस्थित झाले. सरपंचांना आपण कळवले होते अशी भूमिका मुकादम याने मांडल्यावर सभापती पारंगे यांनी त्याला चांगलेच फैलावर घेतले .तुम्ही जर गैरहजर राहणार होतात तर पर्यायी व्यवस्था केली होती का असे विचारल्यावर ग्रामपंचायत अधिकारी सुरज मुकादम निरूत्तर झाले.

**ग्रामसभेसमोर अनेक महत्त्वाचे विषय असताना ग्रामपंचायत अधिकारी अचानक दांडी मारतो .या अगोदर देखील त्यांच्या विरोधात खूप तक्रारी नागरिकांनी केल्या आहेत ग्रामस्थांचा संयमाचा बांध फुटल्याने त्यावर कडक कारवाई करावी अशी भूमिका आम्ही मांडली आहे.**

**– आजिम मांडलेकर–**
**उपसरपंच हाळखुर्द ग्रामपंचायत**

## चौक रेल्वेस्थानकावर बंद केलेल्या गाड्यांना पुन्हा थांबा देण्याची प्रवासी संघटनेची मागणी

**चौक : प्रतिनिधी**

कोरोना काळात बंद करण्यात आलेल्या रेल्वे गाड्या, पुन्हा सुरु करण्यात याव्यात, प्रगती व नांदेड या रेल्वे गाड्यांना थांबा देण्यात यावा, यासाठी खासदार श्रीरंग बारणे यांना चौक येथील प्रतिष्ठित व्यापारी विजू ठाकरे यांनी निवेदन देऊन सविस्तर चर्चा केली, याबाबत लवकरच निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन खासदार श्रीरंग बारणे यांनी दिले.



सद्या पनवेल ते कर्जत हा एक मार्ग सुरू असून दुहेरी रेल्वे मार्गाचे काम प्रगती पथावर सुरू आहे.या कामाची पाहणी करण्यासाठी खासदार श्रीरंग बारणे आले असता त्यांची माजी जिल्हा परिषद सदस्य मोतीराम ठोंबरे,प्रतिष्ठित व्यापारी विजू ठाकरे, अध्यक्ष हर्षल हनुमंते, महादेव गडगे, उप सरपंच गणेश कदम यांनी भेट घेतली, त्यावेळी यावर आपण लवकर बैठक घेऊ असे खासदार श्रीरंग बारणे यांनी आश्वासन दिले.

सद्या या मार्गावरून काही प्रवासी रेल्वे गाड्या आणि मालवाहतूक रेल्वे गाड्या जात आहेत. कोरोना पूर्वी पनवेल कर्जत ही रेल्वे प्रवाशी गाडी सुरू होती, पनवेल पुणे ही लोकल सुरू होती. पनवेल भुसावळ या गाडीचा मार्ग बदली करून ती दौंड मार्गे सुरू केली आहे. ती पुन्हा याच मार्गाने सुरू करण्यात यावी. नांदेड पनवेल ही पनवेल येथे उभी असते, तिला चौक येथे थांबा मिळावा, तर पुणे मुंबई ही प्रगती एक्सप्रेस पनवेल मार्गे दिवा वरून छत्रपती शिवाजी महाराज स्थानकावर जाते, या गाडीला २५ सेकंद थांबा दिल्यास चौक परिसरातील नागरिक,व्यापारी,विद्यार्थी,कामगार,वकील, वादी प्रतिवादी,रुग्ण यांची प्रगती नक्कीच होईल असे व्यापारी विजू ठाकरे यांनी म्हटले आहे.

चौक हे विकसित शहर असून येथे चाळीस गावची बाजारपेठ आहे. याच चौक गावातून अगदी चौक रेल्वे स्टेशन जवळून जुना मुंबई पुणे महामार्ग जातो, येथून जवळच दोन किमी. अंतरावर मुंबई पुणे द्रुतगती महामार्ग आहे,चौक येथूनच थंड हवेचे ठिकाण माथेरान आहे, जे चौक रेल्वे स्थानकावरुण दिसते. चौक येथून कर्जत मार्गे नाशिक व पुढे असा प्रवास होतो,चौक जवळ रसायनी औद्योगिक वसाहत असून जवळच १० ते १२ किमी. अंतरावर औद्योगिक वसाहत आहेत. हा संपूर्ण परिसर विकसित होत असून जवळपास पन्नास हजार लोकसंख्या आहे,मुंबई, ठाणे, नवी मुंबई व पनवेल कडे दररोज अडीच हजार लोक जात असतात. प्रगती एक्सप्रेस ने प्रवासी कार्यालयीन वेळेत मुंबईत पोहचल्याने त्याला आपली कामे पूर्ण करता येतील.

## कुणबी चॅरिटेबल ट्रस्टच्या माणगाव ग्रामीण तालुकाध्यक्षपदी विजय बक्कम

**माणगाव : प्रतिनिधी**



सामाजिक,शैक्षणिक कार्यात रायगड जिल्ह्यासह मुंबई राजधानीत नावलौकिक कमाविलेल्या कुणबी चॅरिटेबल ट्रस्ट मुंबईच्या माणगाव ग्रामीण तालुकाध्यक्षपदी कोशिंबळे गावचे सुपुत्र सामाजिक कार्यकर्ते तथा तरुणांचे आशास्थान विजय बक्कम यांची निवड ट्रस्टचे अध्यक्ष निलेश सत्वे यांनी करून बक्कम यांना पुढील सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. विजय बक्कम यांच्या या निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून विशेष अभिनंदन होत आहे.

कुणबी चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई यांचे सामाजिक,शैक्षणिक क्षेत्रात विशेष नाव आहे. माणगाव तालुक्यासह मुंबईमध्ये त्यांचे चॅरिटेबल ट्रस्टतर्फे कार्य सुरु आहे. या चॅरिटेबल ट्रस्ट मार्फत शेतीविषयक प्रकल्प,ग्रामीण शाळा मदत उपक्रम,ग्रामीण वैद्यकीय सेवा उपक्रम,नैसर्गिक हात व पाय मदत उपक्रम,ग्रामीण वैद्यकीय इन्स्ट्रुमेंट मदत उपक्रम,ग्रामीण निमंत्रण उपक्रम,नैसर्गिक आपत्ती तात्काळ मदत तसेच गोरगरीब जनतेला मदतीचा आहेत असे एक ना अनेक सामाजिक,शैक्षणिक उपक्रम या चॅरिटेबल ट्रस्टतर्फे सातत्याने व यशस्वीपणे राबविले जाते.

या ट्रस्टच्या माणगाव तालुकाध्यक्षपदी नुकतीच कोशिंबळे गावचे सुपुत्र सामाजिक कार्यकर्ते तथा तरुणांचे आशास्थान विजय बक्कम यांची निवड ट्रस्टचे अध्यक्ष निलेश सत्वे यांनी केली आहे.

विजय बक्कम हे सामाजिक व शैक्षाणिक कार्यात अग्रेसर असणारे असे व्यक्तिमत्व आहेत. त्यांचे ट्रस्टमधील मागील दहा वर्षांपासूनचे कार्य पाहता सामाजिक प्रवाहामधून त्यांची ट्रस्टच्या माणगाव तालुकाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.

## चौल तुलाडदेवी टेंभी गल्ली येथील नूतन कॉंक्रिट रस्त्याचा शुभारंभ

**रेवदंडा : प्रतिनिधी**

चौल तुलाडदेवी टेंभी गल्ली येथील नुतन कॉंक्रिट रस्ताचा शुभारंभ कार्यक्रम नुकताच संपन्न झाला. या रस्तासाठी आमदार महेंद्र दळवी यांचे प्रयत्नाने नुतन रस्ता कॉंक्रिटीकरणासाठी निधी उपलब्ध करण्यात आला आहे.

या प्रसंगी चौल जिल्हा परिषद सदस्य डॉं. सचिन राउळ यांची प्रमुख उपस्थितीसह राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जेष्ठ कार्यकर्ते प्रविण राउत, राष्ट्रवादी कॉंग्रेस विभागीय अध्यक्ष महेश कवळे, शिवसेना शिंदे गटाचे कार्यकर्ते नितिन राउत, सुदेश राउळ,विभागीय गण प्रमुख प्रशांत शेणवईकर, मनसे विदयार्थी सेना तालुका अध्यक्ष महेश घरत, सुरेश नागवेकर, शरद राउत, सीमा राउत, शुभम राउत, मनोहर मोगरीकर, सुधाकर म्हात्रे उर्फ भालू, मोहन मोगरीकर, दिलिप राउत, सुभाष राउत, मीना राउत, गणेश घरत, स्वप्नाली घरत, रविंद्र म्हात्रे, कुंदा म्हात्रे, बेजांमिन वासस्कर, रमेश राउत, सुनिल नाईक, अनिल नाईक, विकास घाडगे, अक्षदा अशोक राउत, आशिष काशिनाथ राउत, सिध्देश ठाकूर, महिला शाखा प्रमुख प्राजक्ता नितिन राउत, उपशाखाप्रमुख अमित राउत आदीची उपस्थिती होती.

चौल तुलाडदेवी टेंभी गल्ली रस्ता अनेक वर्षापासून नुतनीकरणासाठी प्रलंबीत होती. या रस्तासाठी स्थानिक ग्रामस्थांचे मागणीनुसार व जि.प.सदस्य सचिन राउळ यांचे प्रयत्नाने आमदार महेंद्र दळवी यांचे माध्यमातून नुतन रस्ता कॉंक्रिटीकरणाचे काम करण्यात आले आहे. या नुतन रस्ता कॉंक्रिटकरण पुर्ण झाले असून या रस्ताचा शुभारंभ जि.प.सदस्य डॉं. सचिन राउळ, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रविण राउत व ग्रामस्थ यांचे हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले.

आमदार महेंद्र दळवी यांचे माध्यमातून चौल मधील अनेक रस्ताचे नुतनीकरण पुर्ण झाले असून उर्वरीत रस्ते नुतनीकरण काम पुर्ण लवकरच पुर्ण होतील, चौलच्या विकासासाठी जिल्हा परिषद सदस्य म्हणून निश्चित कटिबंध्द असल्याचे सुतोवाच जि.प.सदस्य डॉं.सचिन राउळ यांनी केले.



# माणगाव तालुका युवासेनेतर्फे बीएलए मार्गदर्शन मेळावा;नवनिर्वाचित जि.प.व पं. स.सदस्यांचा सत्कार




**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुका युवासेनेतर्फे बीएलए मार्गदर्शन मेळावा नवनिर्वाचित जि.प.व पं. स.सदस्यांचा सत्कार सोहळा मंगळवार दि.२६ मे २०२६ रोजी सायंकाळी मोतीराम प्लाझा बँक्वेट हॉल,माणगाव याठिकाणी उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे आयोजक तालुका युवासेनाप्रमुख ज्ञानेश्वर उतेकर यांचे उपस्थित मान्यवरांनी चांगल्याप्रकारे कार्यक्रमाचे आयोजन केल्याने विशेष कौतुक केले.

या कार्यक्रमास रायगड – पालघर जिल्ह्याचे विभागीय संपर्कप्रमुख प्रदीप खाडे,शिवसेनेचे राज्य समन्वयक अविनाश सणस, रायगड लोकसभा संपर्कप्रमुख अनिल नवगणे,महिला जिल्हा संघटिका नीलिमा घोसाळकर,रायगड जिल्हा युवसेनाप्रमुख विपुल उभारे,माणगाव तालुकाप्रमुख अँड.महेंद्र माणकर,माजी उपजिल्हा प्रमुख रमेश मोरे,माजी नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार,राजिप सदस्य अविनाश नलावडे,दिनेश हरवंडकर,माणगाव पंचायत समिती सभापती विलास शिंदे,पंचायत समिती सदस्य ज्ञानेश्वर पदरत,रवींद्र टेंबे,माणगाव शहर संपर्क प्रमुख प्रसाद धारिया,अक्षय जाधव,शहरप्रमुख नितीन दसवते,सुधीर पवार,निलेश केसरकर,अरुणा वाघमारे,वैभव मोरे,रोहित रातवडकर,प्रवीण बागवे,सचिन मोरे आदींसह तालुका शिवसेनेचे,युवासेनेचे पदाधिकारी,कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना उपस्थित मान्यवरांनी बीएलएच्या कामात तरुणांनी जास्तीतजास्त लक्ष घालून संघटना अधिकतम मजबूत करा असे आवाहन केले.

युवासेना विपुल उभारे,राजिप सदस्य अविनाश नलावडे,ज्ञानेश्वर उतेकर यांनीही उपस्थित तरुणांना मोलाचे असे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात नवनिर्वाचित जिल्हापरिषद सदस्य व पंचायत समिती सदस्य यांचा उपस्थित मान्यवरांच्याहस्ते यथोचित सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन तालुका युवासेनाप्रमुख ज्ञानेश्वर उतेकर यांनी केले.

# विक्रमी कामगिरीसह आरसीबी फायनलमध्ये

## गुजरातला पराभवाचा धक्का



**धरमशाला : वृत्तसंस्था**

धरमशालाच्या मैदानात खेळवण्यात आलेल्या पहिल्या क्वालिफायर सामन्यात गत चॅम्पियन रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुच्या संघाने गुजरात टायटन्सला एकहाती पराभूत करत थेट फायनलमध्ये प्रवेश केला. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुचा संघ सलग दुसऱ्यांदा आणि आयपीएल इतिहासातील पाचव्यांदा फायनल खेळताना दिसेल. गत हंगामात पहिली आयपीएल ट्रॉफी जिंकणाऱ्या बंगळुरुच्या संघाने याआधी २००९, २०११, २०१६ च्या हंगामात फायनल खेळली आहे. एवढेच नाही तर मुंबई इंडियन्स, सीएसके, गुजरात यांच्यानंतर सलग दोन वेळा फायनल खेळणारा आरसीबी हा चौथा संघ ठरला आहे.

पहिल्या क्वालिफायर लढतीत बंगळुरुच्या संघाने नाणेफेक गमावल्यावर पहिल्यांदा फलंदाजी केली. कर्णधार रजत पाटीदारच्या नाबाद ९३ धावांच्या खेळीच्या जोरावर निर्धारित षटकात २५४ धावांसह प्लेऑफ्समधील सर्वोच्च धावसंख्या उभारत त्यांनी गुजरात टायटन्ससमोर २५५ धावांचे लक्ष्य ठेवले होते. या धावसंख्येचा पाठलाग करताना शुभमन गिलचा संघ सपशेल अपयशी ठरला. राहुल तेवतियाच्या अर्धशतकाशिवाय एकालाही मैदानात तग धरता आला नाही. परिणामी गुजरात टायटन्सचा संघ १६२ धावांवर आटोपला आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुच्या संघाने ९२ धावांसह दिमाखदार विजय नोंदवत फायनलचे तिकीट पक्के केले.

पहिल्यांदा फलंदाजी करताना व्यंकटेश अय्यर आणि विराट कोहलीने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुच्या संघाच्य डावाची सुरुवात केली. धावफलकावर अवघ्या २१ धावा असताना व्यंकटेश अय्यर ७ चेंडूत १९ धावांची खेळी करून बाद झाला. विराट कोहली आणि देवदत्त पडिक्कल यांनी दुसऱ्या विकेटसाठी ३८ चेंडूत ७२ धावांची भागीदारी रचत संघाला मजबूत स्थितीत नेले. देवदत्त पडिक्कल १९ चेंडूत ३० धावा तर विराट कोहली २५ चेंडूत ४३ धावा केल्या. त्यानंतर रजत पाटीदार याने क्रुणाल पांड्याच्या साथीनं चौथ्या विकेटसाठी ४५ चेंडूत ९५ धावांची खेळी केली. कृणाल पांड्या २९ चेंडूत ४३ धावा करून परतल्यावर पाटीदारनं शेवटच्या षटकापर्यंत मैदानात थांबूतन ३३ चेंडूत २८१.८२ च्या स्ट्राईक रेटसह नाबाद ९३ धावा करत संघाच्या धावफलकावर २५४ धावा लावल्या. आयपीएलच्या इतिहासातील प्लेऑफ्समधील ही सर्वोच्च धावसंख्या ठरली.

डोंगराएवढ्या धावसंख्येचा पाठलाग करताना गुजरातची सुरुवात खराब झाली. साई सुदर्शन १४ (९), शुभमन गिल २ (७) व जोस बटलर २९ (११) हे आघाडीचे फलंदाज स्वस्तात माघारी फिरले. तेवतियाने ४३ चेंडूत ८ चौकार आणि ४ षटकारांच्या मदतीने केलेल्या ६८ धावांच्या खेळीमुळे गुजरात टायटन्सचा मोठा पराभव टळला. बंगळुरुकडून गोलंदाजीत जेकब डफीने ३ विकेट्स, तर भुवनेश्वर कुमार, रसिक सलाम दार, कृणाल पांड्या यांनी प्रत्येकी २-२, व हेजलवूडने एक विकेट पटकावली.

# रजत पाटीदारचा वर्ल्ड रेकॉर्ड! कर्णधार म्हणून सर्वाधिक षटकार

**मुंबई : प्रतिनिधी**



रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने सलग दुसऱ्यांदा आयपीएल स्पर्धेतील अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. गेल्या हंगामात पंजाब किंग्सला पराभूत करून रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने पहिल्यांदाच जेतेपदाचा मान पटकावला होता. आता आयपीएल २०२६ स्पर्धेतील क्वालिफायर १ सामन्यात गुजरात टायटन्सला पराभूत करून अंतिम फेरीचं तिकीट मिळवलं आहे. गुजरात टायटन्स संघाविरुद्ध झालेल्या महत्वाच्या सामन्यात रजत पाटीदारने नाबाद ९३ धावांची दमदार खेळी केली. या खेळीदरम्यान त्याने ९ षटकार आणि ६ चौकार खेचले. ९ षटकारांसह त्याने मोठा रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे.

गुजरात टायटन्स संघाविरुद्ध झालेल्या सामन्यात रजत पाटीदारकडून तुफान फटकेबाजी पाहायला मिळाली. यादरम्यान त्याने ९ गगनचुंबी षटकार खेचले. यासह आयपीएल २०२६ स्पर्धेत त्याने एकूण ४१ षटकार खेचले आहेत. या षटकारांसह त्याने मोठा रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे. कर्णधार म्हणून जगातील कुठल्याही टी-२० क्रिकेट लीग स्पर्धेत सर्वाधिक षटकार मारण्याचा रेकॉर्ड हा रजत पाटीदारच्या नावे नोंदवला गेला आहे. कुठल्याही कर्णधाराने टी-२० लीग स्पर्धेत आतापर्यंत इतके षटकार खेचले नव्हते.

दरम्यान, या रेकॉर्डमध्ये त्याने पंजाब किंग्स संघाचा कर्णधार श्रेयस अय्यरलादेखील मागे टाकले आहे. श्रेयसने २०२५ मध्ये झालेल्या हंगामात एकूण ३९ षटकार खेचले होते, तर रनमशीन असलेल्या विराट कोहलीने २०१६ मध्ये झालेल्या हंगामात कर्णधार म्हणून ३८ षटकार खेचले होते. डेव्हिड वॉर्नरने २०१६ मध्ये झालेल्या हंगामात ३१ षटकार खेचले होते.

# विराटचा नागिन डान्स व्हिडीओ व्हायरल

**मुंबई : प्रतिनिधी**

रजत पाटीदारच्या नेतृत्त्वाखालील आरसीबी संघाने आयपीएल २०२६ मध्ये धडक मारली आहे. आरसीबीने सांघिक कामगिरीच्या बळावर पहिल्या क्वालिफायरमध्ये गुजरात टायटन्सला ९२ धावांनी पराभूत करून अंतिम फेरी गाठली. आरसीबी सलग दुसऱ्यांदा अंतिम फेरीत दाखल झाली आहे. रजत पाटीदारने ९३ धावांची वादळी खेळी करत आणि संघाला २५४ धावांपर्यंत पोहोचवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. या सामन्यापूर्वी विराट कोहली गुजरातच्या संघाला चिडवतानाचा व्हिडीओ व्हायरल झाला आहे.



पहिला क्वालिफायर सामना धरमशालामध्ये खेळला गेला. सामन्यापूर्वी गुजरातचे सर्व खेळाडू आणि सपोर्ट स्टाफचं फोटोशूट सुरू होतं. यादरम्यान आरसीबीचा संघ त्यांच्या डगआऊटजवळ उभा होता. तर विराट कोहलीही फलंदाजीसाठी पॅड घालून तयार होता आणि सामना सुरू होण्याची वाट पाहत होता. यादरम्यान विराटने गुजरातच्या संघाकडे पाहत नागिन डान्सची खूण केली, ज्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. विराट कोहलीचा मैदानावरील हा मिश्किल अंदाज आणि त्याचा हा व्हिडीओ चांगलाच व्हायरल होत आहे.

विराटचा दुसऱ्या डावात फिल्डिंग करतानाचा एक व्हिडीओ व्हायरल होत आहे. या व्हिडीओमध्ये विराट चेंडू हातात घेऊन गोलंदाजीसाठी रन-अप मार्क करताना दिसत आहे. त्यानंतर त्याने चेंडू जेकब डफीकडे दिला आणि लगेच पंचांकडे गेला. पंचांच्या हातात त्याची कॅप होती. दोघांमध्ये काही क्षण हशा रंगला आणि हा प्रसंग पाहून चाहतेही खूश झाले. हा व्हिडीओ समोर आल्यानंतर अनेकांना विराट खरंच गोलंदाजी करणार का, अशी उत्सुकता लागली होती, मात्र तो फक्त आपल्या मिश्किल अंदाजात मस्करी करीत होता.

# आयपीएलचा आता वर्षातून दोनदा रंगणार थरार

**मुंबई : प्रतिनिधी**

जगातील सर्वात लोकप्रिय टी-२० लीग मानल्या जाणाऱ्या आयपीएलमध्ये आगामी काळात मोठे बदल होण्याची शक्यता आहे. आतापर्यंत आयपीएलचा हंगाम मार्चच्या अखेरीस सुरू होऊन मे महिन्यात संपत होता, मात्र पुढील काही वर्षांत सामन्यांची संख्या वाढवण्याचा विचार सुरू असल्याने स्पर्धेचे स्वरूपही बदलू शकते.

सध्या आयपीएलमध्ये एकूण ७४ सामने खेळवले जातात. भविष्यात ही संख्या वाढवून ९४ करण्याची योजना आहे.



मात्र, एवढे सामने सलग दोन महिन्यांत आयोजित करणे आव्हानात्मक ठरू शकते. विशेषतः एप्रिल आणि मे महिन्यात भारतातील बहुतांश भागात तीव्र उष्णता आणि दमट हवामानामुळे खेळाडूंच्या फिटनेस व दुखापतींच्या समस्या वाढतात. याच पार्श्वभूमीवर आयपीएल दोन टप्प्यांत आयोजित करण्याचा पर्याय समोर आला आहे.

आयपीएलचे अध्यक्ष अरुण धुमाळ यांनी दिलेल्या माहितीनुसार, जर आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या फ्यूचर टूर प्रोग्राम आणि ब्रॉडकास्टर्ससोबत सकारात्मक चर्चा झाली, तर आयपीएलचा हंगाम दोन भागांत विभागला जाऊ शकतो. त्यानुसार आयपीएलचा पहिला टप्पा फेब्रुवारीच्या अखेरीपासून एप्रिलपर्यंत खेळवला जाईल, तर दुसरा टप्पा सप्टेंबर ते ऑक्टोबरदरम्यान होऊ शकतो. सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये भारतातील हवामान तुलनेने आल्हाददायक असते. पावसाळा संपलेला असतो आणि हिवाळ्याची चाहूल लागलेली असते. त्यामुळे खेळाडूंना खेळण्यासाठी अनुकूल वातावरण मिळू शकते.

याशिवाय ऑक्टोबर महिन्यामध्ये भारतात सणासुदीचा हंगाम सुरू होत असल्याने जाहिरातींचे प्रमाणही मोठ्या प्रमाणात वाढते. याचा फायदा ब्रॉडकास्टर्स तसेच आयपीएल व्यवस्थापनाला आर्थिकदृष्ट्या होऊ शकतो.

# शुबमन गिलकडून पराभवाचे खापर खराब फिल्डिंगवर

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएल २०२६ मधील पहिला क्वालिफायर सामना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि गुजरात टायटन्समध्ये पार पडला. या सामन्यामध्ये आरसीबीने गुजरातवर ९२ धावांनी मात करत फायनलमध्ये प्रवेश मिळवला आहे. आरसीबी संघाला गुजरातने बॅटिंगसाठी आमंत्रित केले होते. सुरूवातीपासूनच गुजरातच्या प्रत्येक गोलंदाजावर आरसीबीचे खेळाडू तुटून पडले होते. कर्णधारल रजत पाटीदारच्या ९३ धावांच्या खेळीच्या जोरावर २० ओव्हरमध्ये २५४-५ धावा केल्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना गुजरातच्या संघाला १६२ वर ऑल आऊट करत पाचव्यांदा फायनल गाठली आहे. सामना झाल्यावर गुजरातचा कर्णधार शुबमन गिलने सामना नेमका कुठे गमावला हे सांगितले आहे.




पिचचा काही फरक पडला नाही. आम्ही १२ ते १३ ओव्हरपर्यंत सामन्यामध्ये बऱ्यापैकी होतो पण आमची फिल्डिंग चांगली झाली नाही. कारण कॅच सुटले आणि ग्राउंड फिल्डिंग काही खास झाली नाही. या सामन्यामधून बरंच काही शिकायला मिळालं. हा सामना आम्ही विसरून मोहालीमध्ये नव्या दमाने उतरू. मोठ्या लक्ष्याचा पाठलाग करताना पॉवर प्लेमध्ये चांगली सुरुवात मिळायला हवी असते. कारण अशा मैदानांवर आऊट फिल्ड वेगवान असते. त्यामुळे पॉवर प्लेमध्ये चांगली सुरूवात मिळाली असती तर लक्ष्याचा पाठलाग करणे सोपे झाले असते, असे शुबमन गिल म्हणाला.

फिल्डिंगबाबत आम्ही सराव सत्रामध्ये चर्चा करतो आणि त्यावर काम करतो, पण मला वाटतं की आज आमचा दिवस नव्हता. साई सुदर्शन ज्या प्रकारे आऊट झाला हे क्वचितच होतं, पण खूप दुर्दैवी होतं, असंही गिलने म्हटलं आहे. शुबमन गिल जे बोलला त्यावरून लक्षात येतं की खेळाडूंनी कॅच तर सोडलेच पण पॉवर प्लेमध्ये विकेट गेल्या नव्हत्या पाहिजेत. साईची विकेट गुजरातसाठी धक्का देणारी होती.

# सूर्यवंशीसाठी तूर्तास कसोटी क्रिकेट दूरच

**मुंबई : प्रतिनिधी**

'वंडर बॉय' म्हणून ओळखला जाणारा १५ वर्षीय वैभव सूर्यवंशी स्फोटक फलंदाजीने सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. २०२६ आयपीएलमध्ये राजस्थान रॉयल्सकडून खेळताना त्याने लीग टप्प्यात ५०० हून अधिक धावा केल्या. आयपीएलमधील वैभवची स्फोटक फलंदाजी पाहून क्रिकेट तज्ज्ञ त्याला भारतीय संघात स्थान देण्याची शिफारस करीत आहेत. त्यांच्या मते वैभवला लवकरच टी-२० संघात समाविष्ट केले पाहिजे. यासंदर्भात माजी कर्णधार सौरव



## माजी कर्णधार सौरव गांगुली यांचे मत

गांगुलीनेही वैभव सूर्यवंशीच्या भविष्याबद्दल आणि त्याला भारतीय संघात घेण्याबद्दल मत व्यक्त केले.


भारतीय संघात वैभव सूर्यवंशीच्या निवडीबद्दल विचारले असता गांगुली म्हणाले की, वैभवचा समावेश ताबडतोब टी-२० क्रिकेटमध्ये व्हायला हवा, पण सध्या कसोटी क्रिकेटमध्ये नाही. कसोटी संघात स्थान मिळवण्यासाठी त्याला प्रथम-श्रेणी क्रिकेटमध्ये अजून धावा करण्याची गरज आहे, पण सध्या तो खरोखरंच प्रतिभावान आहे. जगातील कोणत्याही गोलंदाजाविरुद्ध १५ वर्षांच्या मुलाला अशा प्रकारे फलंदाजी करताना पाहणे आश्चर्यकारक आहे. तो भारताचे पुढील भविष्य आहे, असेही गांगुली म्हणाले.

# आयपीएल २०२६मधील पाच 'धुरंधर'

आयपीएल २०२६चा हंगाम सुरू झाला आणि पहिल्याच आठवड्यापासून प्रेक्षकांच्या काळजाचा ठोका चुकवणारा थरार सुरू झाला. कोणी बॅटने चौकार-षटकारांचा पाऊस पाडला, तर कोणी बॉलने स्टंप उडवले. नव्या चेहऱ्यांनी दिग्गजांना आव्हान दिलं, तर अनुभवी खेळाडूंनी 'आम्ही अजून संपलो नाही' हे दाखवून दिलं. प्रेक्षकांना खिळवून ठेवणाऱ्या या हंगामात काही खेळाडू असे आहेत, ज्यांनी आपल्या एकहाती कामगिरीने संघाला जिंकवलं, विक्रम मोडले आणि चाहत्यांच्या मनावर राज्य केलं. पंजाब किंग्ज टेबल टॉपर आहे, दिल्ली कॅपिटल्स नव्या जोशात आहे, तर राजस्थान रॉयल्सने १५ वर्षांच्या पोराला मैदानात उतरवून सगळ्यांनाच थक्क केलं. आतापर्यंत विविध संघांतील काही खेळाडूंनी आयपीएल २०२६चे मैदान गाजवले.

### विराट कोहली : आरसीबीची 'रनमशीन'

'किंग कोहली' पुन्हा एकदा सिद्ध करतोय की फॉर्म तात्पुरता असतो, पण क्लास कायमस्वरूपी.



९ सामन्यांत ३७९ धावा, ५४.१४ ची सरासरी आणि १५५ चा स्ट्राइक रेट ही आकडेवारी विराटच्या '२.० व्हर्जन'ची साक्ष देते.

धावांचा पाठलाग करताना विराट ज्या शांततेने खेळतो, ती तरुण खेळाडूंसाठी मास्टरक्लास आहे. आरसीबीला शेवटच्या ५ षटकांत ६० धावा हव्या असताना तो एकही बिनडोक फटका मारत नाही. सिंगल-डबल घेत, गॅप शोधत, गोलंदाजाला थकवत तो सामना शेवटपर्यंत नेतो आणि जिंकतो. चेन्नईविरुद्ध २५ चेंडूत ४३ धावांची त्याची खेळी पाहिली तर कळतं, पॉवरप्लेमध्ये विकेट पडली तरी आरसीबी घाबरत नाही.

### के. एल. राहुल : डीसीचा 'कॅप्टन कूल'

दिल्ली कॅपिटल्सचा कर्णधार के. एल. राहुल यंदा अगदी वेगळ्याच फॉर्मात दिसत आहे.



९ सामन्यांत ४३३ धावा, ५४.१२ सरासरी आणि १८५.८३ चा विस्फोटक स्ट्राइक रेट राहुल आता फक्त 'अँकर' राहिलेला नाही, तर 'अॅटॅकर' झालाय. २५ एप्रिलला पंजाब किंग्जविरुद्ध त्याने जी नाबाद १५२ धावांची खेळी केली, ती आयपीएलच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिली जाईल. १६ चौकार, ९ षटकार मारत त्याने मोहालीच्या मैदानाला लहान करून टाकलं. विशेष म्हणजे १२ धावांवर त्याला जीवदान मिळालं आणि त्यानंतर त्याने शानदार १४० धावा कुटल्या.

### वैभव सूर्यवंशी : आरआरचे १५ वर्षांचे 'सुपरनोव्हा'

राजस्थान रॉयल्सने वैभव सूर्यवंशीला संधी दिली तेव्हा अनेकांनी भुवया उंचावल्या.



पण या १५ वर्षांच्या पोराने पहिल्याच सामन्यापासून गोलंदाजांची झोप उडवली. १० सामन्यांत ४०४ धावा आणि २३७.६४ चा स्ट्राइक रेट ही आकडेवारी विश्वास बसणार नाही अशी आहे. पॉवरप्लेमध्ये तो असा तुटून पडतो की गोलंदाजाला फिल्डिंग कुठे लावायची हेच कळत नाही. स्वीप, रिव्हर्स स्वीप, स्लॉग, कव्हर ड्राइव्ह त्याच्या बॅटमधून प्रत्येक शॉट निघतो. मुंबई इंडियन्सविरुद्ध त्याने १८ चेंडूत ५० ठोकले तेव्हा वानखेडेवर फक्त 'वैभव-वैभव'चा नारा घुमत होता. संजू सॅमसनने त्याला ओपनिंगला पाठवून 'गॅम्बल' खेळला आणि ते सोनं झालं.

### विजयकुमार वैशाक : पंजाब किंग्जचा 'यॉर्कर किंग'

पंजाब किंग्ज यंदा टेबल टॉपर आहे आणि त्याचं सगळ्यात मोठं कारण म्हणजे विजयकुमार वैशाक.



७ सामन्यांत ५ विकेट्स ही संख्या छोटी वाटेल, पण त्याने त्या कधी घेतल्या हे महत्त्वाचं. सीएसके विरुद्ध १८ व्या षटकात त्याने धोनी आणि जडेजाला लागोपाठ बाद केलं आणि सामना फिरवला. १४० किमी/तास वेगाने तो टाचेजवळ यॉर्कर टाकतो, आणि त्याच वेगाने स्लोअर बॉल टाकून फलंदाजाला चकवतो. डेथ ओव्हर्समध्ये कर्णधार श्रेयस अय्यरचा विश्वास फक्त वैशाकवर असतो. त्याची लेट स्विंग होणारी बॉलिंग पाहून बुमराहची आठवण येते.

### अंगक्रिश रघुवंशी : केकेआरची 'एकमेव ज्योत'

कोलकाता नाईट रायडर्सची सुरुवात खराब झाली. पहिले दोन्ही सामने गमावले.



संघात गोंधळ, फॉर्मचा अभाव. पण या सगळ्या गदारोळात २१ वर्षीय अंगक्रिश रघुवंशी तेवत राहिला. २ डावांत १०३ धावा, पण त्याची गुणवत्ता धावांपेक्षा जास्त आहे. एसआरएच विरुद्ध ईडन गार्डन्सवर त्याने ५२ धावांची खेळी केली तेव्हा त्याचा बॅक-फूट पंच आणि पिक-अप शॉट पाहून समालोचकही थक्क झाले. तो घाबरत नाही. १४५ किमी/तास वेगाने येणाऱ्या बॉलवर हुक मारतो, स्पिनरला पायरी वापरून मारतो. केकेआरचे चाहते निराश असले तरी अंगक्रिशला पाहून त्यांना आशेचा किरण दिसतो. हा मुलगा भारताचा पुढचा नंबर ३ फलंदाज होऊ शकतो.

दुसरे पुण्यस्मरण



स्व.सौ. इंदिरा शांताराम जगताप
जन्म ०१/०६/१९४० स्वर्गवास २८/०५/२०२४
तुझं असणं आमच्यासाठी सर्व होत,
ते आमच्या आयुष्यातील प्रेमळ पर्व होत,
आज सर्व काही असल्याची जाणीव आहे,
पण तुझं नसणं हीच मोठी उणीव आहे.
आपल्या स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली
:: शोकाकुल ::
श्री. शांताराम जनार्दन जगताप (पती)
श्री. शेखर शांताराम जगताप (मुलगा)
श्री. प्रथमेश शेखर जगताप (नातू)
सौ. मनीषा शेखर जगताप (सून)

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com